मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले






। मुख्य संपादक - भारती आमले । उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : 3 ■ अंक : ९४ ■ शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514


# वेळप्रसंगी इंडिगोच्या CEO ची हकालपट्टी करू - राममोहन नायडू



**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांची हकालपट्टी करण्याचा इशारा केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी दिला आहे. इंडिगो एअरलाइन्समुळे प्रवाशांना होत असलेल्या गैरसोयीबद्दल नायडू यांनी प्रवाशांची माफी मागितली. तसेच याप्रकरणी दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे नायडू म्हणाले. इंडिगो एअरलाइन्सकडून हे सर्व हेतुपुरस्सरपणे केले जात असल्याची शंकादेखील नायडू यांनी व्यक्त केली आहे.

इंडिगो एअरलाइन्सकडून प्रवाशांना होत असलेल्या त्रासाबद्दल नायडू म्हणाले, इंडिगोकडून होत असलेल्या गैरसोयीबद्दल मी प्रवाशांची माफी मागतो. हवाई क्षेत्र सुरळीतपणे सुरू राहावे, ही मंत्री म्हणून माझी जबाबदारी आहे. जेव्हा अशा प्रकारच्या समस्या येतात तेव्हा जबाबदारी आणखी वाढते. या परिस्थितीसाठी कारणीभूत असलेल्या दोषींवर कारवाई करणे, तसेच भविष्यात अशी समस्या निर्माण होऊ नये म्हणून उपाययोजना करणे ही आमची जबाबदारी आहे. प्रवाशांची सुरक्षा आणि हक्क अबाधित ठेवणे महत्त्वाचे आहे.

गरज पडल्यास इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांची हकालपट्टी करू तसेच त्यांच्यावर सर्व प्रकारच्या दंडात्मक कारवाया केल्या जातील, असा इशारा देखील नायडू यांनी दिला आहे.

ते म्हणाले, मागील सात दिवसांपासून माझी व्यवस्थित झोप झाली नाही. मी माझ्या कार्यालयात बसून सतत आढावा बैठका घेत आहे.

# पुणे महानगर क्षेत्रात २२० प्रकल्पांची कामे; ३२ हजार ५२३ कोटींचा निधी मंजूर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**नागपूर, प्रतिनिधी :**

राज्यातील वाढते नागरीकरण लक्षात घेता शहरवासीयांना नागरी सोयी-सुविधा देण्यास राज्य शासनाचे प्राधान्य आहे. पुणे शहराचा विस्तारही मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्या अनुषंगाने पुणे महानगर क्षेत्रात २२० प्रकल्पांतर्गत विविध विकासकामे हाती घेण्यात आली असून त्यासाठी ३२ हजार ५२३ कोटींचा निधी मंजूर करण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. रस्ते विकास नियोजनानंतरच शहर विकासाचे आराखडे तयार करावेत, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.




पुणे महानगर नियोजन समितीच्या पाचव्या सभेचे आयोजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांच्याअध्यक्षतेखाली विधानभवनातील मंत्रीपरिषद सभागृहात करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार सर्वश्री तानाजी सावंत, सुनील शेळके, सिद्धार्थ शिरोळे, शंकर मांडेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुणे महानगरसाठी विहित कालमर्यादेत 'स्ट्रक्चर प्लॅन' तयार करताना त्यामध्ये भविष्यातील वाढणारी लोकसंख्या, नागरीकरण यांचा विचार करण्यात यावा. प्लॅन तयार करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. विकासाचे नियोजन करताना विविध प्राधिकरणांकडे काही क्षेत्रांच्या विकासाची जबाबदारी न देता संपूर्ण क्षेत्राचा विकास एकाच प्राधिकरणाने करावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

पुणे महापालिकेत ३० जून २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या २३ गावांचे विकास नियोजन पुणे महापालिकेने करावे. पुणे ग्रोथ हबसाठी विकास आराखडा शासनाच्या मित्रा संस्थेकडून करण्याबाबत पडताळणी करावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. पुणे शहरामध्ये माण- म्हाळुंगे टाऊनशिप प्लॅनिंग योजनेचे काम गतीने पूर्ण करावे. शहरामध्ये एकीकृत टाउन प्लॅनिंगच्या १५ योजनांवर काम सुरू असून यामध्ये कालमर्यादा निश्चित करण्यात यावी. वेळेत योजना पूर्ण झाल्यास त्याचा लाभ सर्वांना होतो, त्यामुळे कुठेही विलंब न लावता या योजनांची कामे पूर्ण करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

पुणे विद्यापीठ जवळील उड्डाणपुलाच्या लोकार्पणाची वाट न बघता नागरिकांच्या सेवेसाठी तो सुरू करावा.

## ( ) थोडक्यात ( )

### इलेक्ट्रिक व्हेईकल सक्तीच्या नियमासाठी एक वर्षाचा अवधी द्या; बाईक टॅक्सी असोसिएशनची मागणी

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने फक्त इलेक्ट्रिक बाईक्सनाच बाईक टॅक्सी म्हणून परवानगी देणारा जीआर जारी केल्यानंतर हजारो रायडर्स एका रात्रीत बेरोजगार झाले आहेत. अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे आवश्यक पायाभूत सुविधा, अनुदाने आणि शासकीय मदत नसताना रायडर्स आणि लाखो प्रवासी अडचणीत आले आहेत.बाईक टॅक्सी असोसिएशन (बीटीए)ने या जीआरला कडाडून विरोध दर्शवला आहे.

# अहिल्यानगर –मनमाड महामार्गाचा प्रश्न उच्च न्यायालयात दाखल

**दैनिक युवक आधार**

**नगर, प्रतिनिधी :** अहिल्यानगर-मनमाड हा राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक १६०) हा जिल्ह्यातील प्रमुख दळणवळणाचा रस्ता असूनही गेल्या तीन दशकांपासून या महामार्गाच्या खराब आवसस्थेमुळे अपघातांची मालिका थांबण्यास तयार नाही. अब्जावधी रुपये खर्च करूनही हा महामार्ग आजपर्यंत पूर्णपणे आधुनिक व सुरक्षित स्वरूपात विकसित झालेला नाही. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या गंभीर समस्येला वाचा फोडण्यासाठी तांभेरे येथील सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब पवार यांनी ॲड. शिवराज कडू यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे.



यापूर्वीही याचिकाकर्ते दादासाहेब पवार यांनी या महामार्गावरील धोकादायक स्थिती संदर्भात वेळोवेळी विविध शासकीय विभाग व संबंधित ठेकेदाराकडे निवेदने सादर केली होती. यामध्ये अपघातप्रवण ठिकाणी धोक्याचे सूचना फलक लावणे, ब्लॅक स्पॉटसंदर्भात जनजागृती करणे, मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई करणे, तसेच घडलेल्या अपघातांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, ठेकेदार व संबंधित लोकप्रतिनिधींवर सदोष मनुष्यवधाच्या जबाबदारीची कारवाई करावी, अवजड वाहतूक कोपरगाव व अहिल्यानगर येथून पर्यायी मार्गाने वळवावी, अशा प्रमुख मागण्यांचा त्यामध्ये समावेश होता.या महामार्गावर राहुरी कृषी विद्यापीठ, अहिल्यानगर शहर तर शिर्डी, शिंगणापूरसारखी जागतिक श्रद्धास्थाने तसेच अनेक तालुक्यांची शहरे वसलेली आहेत. त्यामुळे बाहेरून येणारे विद्यार्थी व भाविक मोठ्या प्रमाणावर ये-जा करतात.

# खारघरमध्ये २ कोटी ७२ लाखांचा गुटखा नष्ट

## अमली पदार्थ विरोधी पथकाची धडाकेबाज कारवाई

**दैनिक युवक आधार**

**दिपक कांबळे/खारघर :** नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने (ANC) अवैध गुटखा माफियावर मोठा घाव घालत तब्बल ₹2 कोटी 72 लाखांचा गुटखा जप्त करून डोंगर भागात नष्ट केला. ही कारवाई ११ डिसेंबर रोजी दोन पंचांच्या उपस्थितीत न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, 21 जुलै रोजी कामोठे परिसरातून एक टाटा टेम्पो ताब्यात घेण्यात आला होता. त्यानंतर तपासाची दिशा बदलत 23 जुलै रोजी भिवंडी येथून चार कंटेनर भरून आणलेला प्रचंड साठा जप्त करण्यात पोलिसांना यश आले. या संपूर्ण प्रकरणात ANC पथकाला प्राथमिक तपासातून महत्त्वाचे धागेदोरे मिळाल्याने पुढील तपासाला गती मिळाली. न्यायालयाकडून मिळालेल्या परवानगीनंतर, जप्त केलेल्या सर्व गुटख्याचा खारघर येथील डोंगर भागात विलेव्हाट (नाश) करण्यात आला.



पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध गुटखा व्यवहार करणाऱ्या टोळ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.कारवाईत सहभागी धडाडीचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सूरज गोरे,हवालदार पदू दोरे,अंकुश म्हात्रे,रमेश तायडे पोलिस शिपाई कृष्णा धोंडे,परमेश्वर भाभड,तुकाराम सोनवलकर सर्वत्र कौतुक होत आहे. ANC पथकाच्या या संयुक्त उपक्रमामुळे अवैध गुटखा साखळीला मोठा धक्का बसला असून, नवी मुंबई पोलिसांनी पुन्हा एकदा गुन्हेगारीविरोधी आपली कडक भूमिका स्पष्ट केली आहे.







# फक्त ३० मिनिटांत मुंबई!

## १५ डिसेंबरपासून नेरुळ-भाऊचा धक्का फेरी सुरू होणार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई, प्रतिनिधी :**दीर्घकाळापासून रखडलेल्या नवी मुंबईच्या जलवाहतूक प्रकल्पाला अखेर गती मिळाली आहे. नेरुळ ते भाऊचा धक्का प्रवासी फेरी सेवा १५ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. हिंदूस्थान टाईम्सने याबाबतचं वृत्त दिलं आहे. या सेवेमुळे सध्या ९० मिनिटांचा रोड प्रवास केवळ ३० मिनिटांत पूर्ण होणार आहे. सिडकोने उभारलेल्या नेरुळ पॅसेंजर वॉटर टर्मिनल (NPWT) साठी ही सेवा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे, कारण उद्घाटनापासून हे टर्मिनल जवळपास निष्क्रियच आहे.



**दिवसातून ४ ट्रिप, प्रति प्रवासी भाडे ₹९३५**

हिंदुस्थान टाईम्सच्या माहितीनुसार, सुरुवातीला दररोज चार ट्रिप्स आणि २० आसनी फेरी या मार्गावर धावेल. प्रति प्रवासी ₹९३५ इतके भाडे आकारले जाईल. मेरीटाईम बोर्डाकडून अंतिम परवानगी मिळताच सेवा अधिकृतरीत्या सुरू केली जाईल. ही मंजुरी वेळेवर मिळण्याची अपेक्षा असल्याचे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**सुरक्षा कडक; पर्यटकांसाठी नवे आकर्षण**

फेरीचे ऑपरेटर 'वॉटरफ्रंट एक्सपिरीयन्सेस मुंबई प्रा. लि.' (द्रीष्टी ग्रुप) यांनी नेरुळ–मुंबई मार्गासाठी सुरक्षा अधिक कडक केली आहे. तसेच, पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ऑपरेटरकडून विविध योजना तयार केल्या जात आहेत.

- सर्व प्रवाशांनी चढताना लाईफ जॅकेट परिधान करणे बंधनकारक
- जानेवारीपासून स्पीडबोट शो
- लवकरच जेट-स्कीइंग
- फ्लोटिंग रेस्टॉरंट
- फ्लेमिंगो टुरिझम सर्किट
- वॉटरस्पोर्ट्स, स्पीडबोट शो, जेट-स्की यांसारखे उपक्रम जानेवारीपासून
- मुंबईहून येणाऱ्या पर्यटकांना नेरुळ जेटीवर ओरिएंटेशन देऊन डीपीएस लेक परिसरात फ्लेमिंगो निरीक्षणासाठीही नेले जाईल.

सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल म्हणाले, "विमानतळ, मेट्रो आणि नवीन रस्ते यांच्यासोबत आता जलवाहतूकही महत्त्वाचा वाहतूक दुवा ठरणार आहे.

हा मार्ग प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी करेल आणि संपूर्ण नेटवर्क अधिक गतिमान करेल." सिंघल यांनी सांगितले की नेरुळ टर्मिनल आता योजनेप्रमाणे बहुमार्गीय समुद्री केंद्र बनण्याच्या दिशेने पुढे जात आहे. "एलिफंटा सेवा आधीपासूनच सुरू आहे, भाऊचा धक्का लिंक तयार आहे आणि पर्यटकांसाठी नवे उपक्रमही सुरू आहेत," असे ते म्हणाले.

# गव्हाण हायस्कूलमध्ये शालेय विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर :**
**ही आहे विज्ञानाची दुनिया**
**चला पाहूया बालवैज्ञानिकांची किमया**



विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या बालवैज्ञानिकाच्या शोध घेत त्यांच्यातील वैज्ञानिक संकल्पनांना पुष्टी देण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण- कोपर येथे मंगळवार दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी शालेय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या अनुषंगाने विज्ञान प्रदर्शनाची पूर्वतयारी म्हणून गुरुवार दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेत उस्फूर्त सहभाग नोंदवून विविध शैक्षणिक साहित्यांची आणि वैज्ञानिक प्रकल्पांची निर्मिती केली होती. या तयार वैज्ञानिक प्रकल्पात आणि शैक्षणिक साहित्यात विद्यालयातील विज्ञान शिक्षकांनी मार्गदर्शन करून त्या साहित्याला आणखीन दर्जेदार बनवण्यासाठी विद्यार्थ्यांना सहाय्य केले आणि या प्रकल्पांची तयारी करत मंगळवार दिनांक ९ डिसेंबर रोजी विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन विद्यालयात करण्यात आले.

यावेळी गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच तथा पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्य सौ रत्नप्रभा ताई घरत यांच्या शुभहस्ते विज्ञान प्रदर्शनाचे शानदार उद्घाटन संपन्न झाले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करत रोबोटच्या सहाय्याने प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य श्री अनंताशेठ ठाकूर साहेब, श्री विश्वनाथ कोळी साहेब, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच श्री विजयशेठ घरत साहेब,सौ. योगिताताई भगत, श्री सुधीर ठाकूर, श्री वैभव घरत या मान्यवरांच्या उपस्थितीत विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न झाले. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या सौ.ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक श्री. विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका सौ. शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर श्री. रवींद्र भोईर,लाईफ वर्कर श्री. देवेंद्र म्हात्रे उपस्थित होते.या शालेय विज्ञान प्रदर्शनात ४ वी ते ९ वी अखेर ३४ प्रकल्पांची मांडणी करण्यात आली होती. यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर, चांद्रयान, ग्रीन सिटी, ज्वालामुखी उद्रेक, जलशुध्दीकरण आणि अनेक वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित प्रकल्प मांडण्यात आले होते. मान्यवर प्रकल्पाची पाहणी करत असताना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे देत आपल्या प्रकल्पाचे उद्दिष्ट समजावून सांगितले. विज्ञान प्रदर्शन प्रमुख श्री. एस.के.भोईर आणि सौ.सी.एन.ठाकूर यांनी या शालेय विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन केले होते.

# लासलगांवचे आराध्य दैवत प. पू. भगरीबाबा यांची ६१ वी पुण्यतिथी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**महेश साळुंके/ लासलगाव प्रतिनिधी** : लासलगांव व परीसरातील भाविकांचे आराध्य दैवत प. पू. भगरीबाबा यांच्या ६१ व्या पुण्यतिथीनिमित्त दि. ०५ नोव्हेंबर ते दि०१ नोव्हेंबर ह्या सप्ताह कालावधीत दररोज ह. भ. प. गणेश महाराज करंजकर, भगुर यांच्या अमृतवाणीतुन संगीतमय श्री स्वामी समर्थ चरीत्र कथा, संत सम्राट माऊली ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशताब्दी सुवर्णमहोत्सवानिमित्त श्री ज्ञानेश्वरीतील सदगुरू स्तवन प्रवचन, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ चालक ह. भ. प. मधुकर महाराज गांगुर्डे व ह. भ. प. अशोक महाराज संत यांच्या उपस्थितीत सामुदायिक श्री ज्ञानेश्वरी पारायण, हरीपाठ व दि. ११नोव्हेंबर रोजी ह. भ. प. रघुनाथ महाराज खटाणे (खेडलेकर) यांचे काल्याचे किर्तन आणि महाप्रसाद इ. धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



पुण्यतिथीनिमित्त मंदीर परीसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. बाजार समितीचे सदस्य राजेंद्र बोरगुडे यांच्या शुभहस्ते सपत्नीक बाबांची विधीवत पुजा व उपस्थित पदाधिकारी व भाविकांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर लासलगांव शहरातुन बाबांची प्रतिमा, पालखी व कथाव्यास यांची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. मिरवणुकीत लासलगाव व परीसरातील पुरूष, महिला, भजनी मंडळ, न्यासाचे अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, बाजार समितीचे उपसभापती संदीप दरेकर, सदस्य छबुराव जाधव, महेश पठाडे, प्रविण कदम, बाळासाहेब दराडे, रमेश पालवे, सचिव नरेंद्र वाढवणे यांचेसह बाजार समितीचे व्यापारी वर्ग, बाबा अमरनाथ ग्रुप, प. पू. भगरीबाबा दिंडी सोहळयाचे सर्व सदस्य, प. पू. भगरीबाबा भक्त मंडळ, श्री स्वामी समर्थ महाराज व श्री शंकर महाराज यांचे सेवेकरी, श्री गायत्री परीवाराचे सदस्य यांचेसह परीसरातील सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदर मिरवणुक प. पू. भगरीबाबा मंदीर, मार्केट यार्ड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पथ मार्गे शिवाजी चौक, झेंडा चौक, अहिल्याबाई चौक, पाटील गल्ली, संत नामदेव पथ, झेंडा चौक मार्गे समाधी मंदीराजवळ विसर्जीत करण्यात आली. मिरवणुक मार्गावर संपुर्ण गावात आकर्षक रांगोळी काढुन मिरवणुकीची शोभा वाढवली. यावेळी ह. भ. प. रघुनाथ महाराज खटाणे (खेडलेकर) यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता करण्यात आली.

प. पू. भगरीबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने भगरीबाबा मंदीरात श्री साईनाथ रक्तपेढी, नाशिक यांच्या सौजन्याने सकाळी ०८ ते ०४ ह्या वेळेत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर रक्तदान शिबीरात बाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त ५१ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले.

त्यानंतर आयोजित महाप्रसादाचा उपस्थित भाविक भक्त व नागरीकांनी लाभ घेतला. पुण्यतिथी सोहळा यशस्वी करण्यासाठी प. पू. भगरीबाबा भक्त मंडळ, बाबा अमरनाथ ग्रुप, प. पू. भगरीबाबा दिंडी सोहळयाचे सर्व सदस्य, बाजार समितीचे सहसचिव प्रकाश कुमावत, सहाय्यक सचिव सुरेश विखे, सुशिल वाढवणे, सर्व लिलाव प्रमुख काकासाहेब जगताप, सौ. मिनाक्षी गायकवाड, हिरालाल सोनारे, संदीप होळकर, महेश धामणे, मनोज शेजवळ, नंदकुमार गोधडे, संजय होळकर, राहुल बर्डे, गौरव निकम, संतोष गायकर, राहुल शेजवळ, गोरख विसे, ज्ञानेश्वर जगताप, रामदास गायकवाड, गणेश आहेर, सचिन वाघ, सचिन बैरागी, शुभम उपाध्ये, विकी कासव, सागर खुटे, सोमनाथ जगताप, लाला ठाकरे, सुशिल जोशी, अरूण ठाकरे, दत्तात्रय घोडे, हर्षवर्धन होनराव, दिपक जेऊघाले, सुमित होळकर, सोमनाथ शिंदे यांचेसह सर्व कर्मचारी वर्ग यांनी विशेष परीश्रम घेतले.

# मुदगल येथे कृषी विभागाकडून कृषी विस्तार ॲपची जनजागृती

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे / पाथरी** -: तालुक्यातील मुदगल येथे कृषी विभागाकडून कृषी विस्तार ॲप संदर्भात मार्गदर्शन कृषी महाविस्तार ॲप शेतकऱ्यांच्या सदैव मदतीस तयार असल्याचे पाथरी तालुकाकृषी अधिकारी गोविंद कोल्हे यांनी सांगितले यावेळी मंडळ कृषी अधिकारी रुपेश बोबडे उपकृषी अधिकारी रवि कुरंगळ सहाय्यक कृषी अधिकारी नितीन दुगाणे यांनी कृषी विस्तार ॲप संदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले



यावेळी यात शेतकऱ्यांना डिजिटल मदत पुढील पाच दिवसांत हवामान अंदाज पिकांसाठी सल्ला व शेतीचे तंत्रज्ञान माती तपासणी व खत गुणधर्म किड रोग नियंत्रण माहिती शेतमालाच्या रोजचा बाजारभाव अशी माहिती मिळणार आहे तरी शेतकऱ्यांनी कृषी विस्तार ॲप आपल्या मोबाईलवर डाऊनलोड केल्यानंतर शेतकऱ्यांना कोणाच्याही सल्ला घेण्याची आवश्यकता असणार नाही प्रत्येक प्रश्नाचे उत्तर या मधून मिळतील त्यामुळे कृषी केंद्रावरील दुकानदारांने सांगितलेली महागडी औषधे घ्यावी लागणार नाहीत तसेच विविध फळबाग पिके घेतली जात असल्यास त्या परिसरात पुरक व्यवसाय सुरू करता येईल व शेतीचा उत्पादन खर्च विना डायरी पेन चा यामध्ये लिहिता येईल व शेती विषयक संपूर्ण सुविधा या ॲप मध्ये उपलब्ध आहेत.तर या महाविस्तार ॲपचा पाथरी तालुक्यातील मुदगल येथील एका दिवसात १३८ शेतकऱ्यांनी हे ॲप डाऊनलोड करून घेतले आहे अशी माहिती पाथरी तालुका कृषी अधिकारी गोविंद कोल्हे यांनी सांगितले

# ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे लॅपटॉप तहसीलात जमा; 'नवीन उपकरणे द्या अन्यथा आंदोलन!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** घाटंजी तालुक्यातील ग्राम महसूल अधिकाऱ्यांना कामकाजाची गती देणारे लॅपटॉप कालबाह्य झाल्याने महसूल विभागातील दैनंदिन प्रक्रिया ठप्प होण्याच्या मार्गावर आली आहे. सातबारा उतारे, फेरफार प्रस्ताव, पीक नोंदणी तसेच शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे—ही सर्व कामे गावपातळीवर प्रामुख्याने संगणकावर अवलंबून असल्याने साधनांच्या तुटवड्यामुळे नागरिकांची गैरसोय वाढत आहे.



शासनाला वारंवार लेखी मागणी करूनही नवीन लॅपटॉप उपलब्ध न झाल्याने अखेर ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी कालबाह्य मशीन तहसील कार्यालयात जमा करत तहसीलदार विजय साळवे यांना निवेदन सादर केले. "शेतकऱ्यांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, सेवा खंडित होऊ नयेत," या मागणीसह तातडीने कार्यक्षम लॅपटॉप पुरविण्याचा आग्रह या निवेदनातून व्यक्त करण्यात आला.

ग्रामस्तरावरील महसूल कामकाज जवळजवळ ठप्प होत असल्याने अधिकाऱ्यांमध्ये नाराजी वाढत असून, प्रश्न लांबणीवर पडल्यास आंदोलनाची चेतावणीही देण्यात आली आहे.

"नवीन लॅपटॉप तात्काळ उपलब्ध न केल्यास आम्हाला बेमुदत कामबंद आंदोलन हाच पर्याय उरेल,"असा इशारा विदर्भ पटवारी संघाचे सहसचिव रामेश्वर कुमरे यांनी दिला.

**Best Opportunity For**



- House Wife
- Retired
- Teacher
- Businessman

- We are fastest growing organization
- Work Fulltime or Part time as per your requirement
- No Target, No Investment
- Reward & Recognition
- Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.

**Gauri gaikwad:8898632067**

# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पोखरी (घाट)चा सोहम मुळीक चमकला

## अमरावती–मुंबईच्या मल्लांना पराभूत करीत 'कांस्य' पदकाची कमाई

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** सिंधुदुर्ग जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ यंदा ओरस येथे भव्य प्रमाणावर पार पडल्या. राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील छोट्याशा पोखरी (घाट) गावातील कुस्तीपटू सोहम जीवन मुळीक याने शानदार खेळ करून आपली वेगळी ओळख निर्माण केली. १४ वर्षांखालील गटातील ४४ किलो वजनी गटात स्पर्धा अत्यंत चुरशीच्या झाल्या. राज्यातील पारंपरिक ताकदीची केंद्रे मानल्या जाणाऱ्या अमरावती व मुंबई येथील अनुभवी मल्लांना रोखत सोहमने तांत्रिक, आक्रमक आणि सातत्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. प्रतिस्पर्ध्यांच्या डावपेचांवर अचूक उत्तर देत अखेर कांस्यपदकावर नाव कोरले. पदक जिंकल्यानंतर सोहम आपल्या जन्मगावात परतताच पोखरी (घाट) गाव उत्साहाने फुलून गेला. ढोल-ताशे, लेझीम पथक, बॅण्ड आणि आतिषबाजीच्या गजरात घोड्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

"जय सोहम", "आमचा मल्ल विजयी होवो" अशा गगनभेदी घोषणा देत गावकऱ्यांनी सोहमवर पुष्पवृष्टी केली. गावातील सर्वच वयोगटातील नागरिक या अभिमानाच्या क्षणाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहम मुळीक हा पोखरी (घाट) येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असून कुस्तीसाठी ओळखला जाणारा जिद्दी विद्यार्थी आहे. सध्या तो वाशी तालुक्यातील रुई येथे असलेल्या न्यू छत्रपती शाहू महाराज कुस्ती संघात नियमित तालीम घेतो. कठोर मैदानी सरावाने त्याची तांत्रिक क्षमता आणि शिस्त अधिक बळकट झाली आहे. सोहमच्या यशामागे अनेक मल्ल-वस्तादांचे मोलाचे योगदान आहे. त्याला मार्गदर्शन करणाऱ्यांमध्ये वस्ताद



तात्यासाहेब बहीर, महाराष्ट्र केसरी कोच दत्ता मेटे, वस्ताद आनंदराव पाटील, बाळासाहेब सुबुगडे, उमेश महाडीक या शिवाय गावातील वस्ताद दादासाहेब खिल्लारे यांनी सोहमला लहानपणापासूनच आधार देत प्राथमिक तालमीचे संस्कार दिले. या सर्वांच्या परिश्रमातूनच सोहमचा कसदार खेळ घडून आला. सोहमच्या प्रगतीत त्याच्या शाळेतील शिक्षकांचा आणि कुटुंबीयांचा मोठा वाटा आहे.पोखरी जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक राजेंद्र येडे सर यांनी सातत्याने प्रोत्साहन दिले. सोहमचे वडील जीवन मुळीक हे प्रत्येक स्पर्धेत मुलाच्या सोबत राहून मानसिक आधार देतात. ग्रामस्थ, शिक्षक व वस्तादांच्या शुभेच्छांच्या जोरावर सोहम आता पुढील राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी तयारीला लागला आहे. "सोहम लवकरच राष्ट्रीय पदक पटकावून बीड जिल्ह्याचे नाव देशभर उंचावेल," असा ठाम विश्वास गावकऱ्यांनी व्यक्त केला. जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात आयोजित अभिनंदन समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बेलगाव संस्थानचे मठाधिपती शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराज, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के तसेच कार्यक्रमाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे उपस्थित होते. प्रास्ताविक राजेंद्र येडे सरांनी, तर आभार प्रदर्शन सुरेश ढास सरांनी केले. या कार्यक्रमाला मजूर फेडरेशनचे अध्यक्ष बद्रीनाथ जटाळ,मल्ल सुरेश दादा घुगे, बेलगावचे माजी सरपंच अश्विन शेळके, सोमनाथवाडीचे माजी सरपंच आकाश शेळके, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सरपंच बिभीषण मुळीक व दादासाहेब खिल्लारे यांनी केले.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे आंतर-महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेचे उद्घाटन



**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धा गुरुवार दिनांक ११ डिसेंबर २०२५ व १२ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या आंतर-महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेचे उद्घाटन चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य व मुंबई शहर झोन-१चे उपाध्यक्ष प्रो. डॉ. एस.के.पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांनी केले. त्याचबरोबर मुंबई शहर झोन-१ सचिव डॉ.मनोज वर्मा, मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सचिव डॉ. व्ही. बी. नाईक व मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सह-सचिव मा. पूनम मुजावर यांची उपस्थिती लाभली.

तसेच स्पर्धेमध्ये १२ मुलांचे संघ आणि १० मुलींच्या संघांनी सहभाग नोंदविला.या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती, प्रा. भरत जितेकर व प्रा. प्रतिज्ञा पाटील, जिमखाना विभागाचे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेत आहे.

# सेरेब्रल पाल्सीग्रस्त म्हसळ्यातील ऋषिकेशच्या कळसुबाई मोहिमेची प्रेरणादायी कथा

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा तालुका प्रतिनिधी**

**शिरीष समेळ :** मर्यादा कितीही असल्या तरी जिद्द, पालकांचा आधार, आणि योग्य मार्गदर्शन असेल तर अशक्य वाटणारे शिखरही गाठता येते, याचे हे जिवंत उदाहरण म्हणजे सेरेब्रल पाल्सी या आजाराने त्रस्त असलेला पण मन मात्र पर्वताएवढे भक्कम असलेला ऋषिकेश शितल सुदाम माळी (वय २२) या युवकाने महाराष्ट्रातील सर्वात उंच असलेल्या १६४६ मीटर उंच कळसुबाई शिखरावर विजय मिळवला आणि एक अभूतपूर्व पराक्रम साकारला. महाराष्ट्राच्या 'माऊंट एव्हरेस्ट' मानल्या जाणाऱ्या या शिखरावर जेव्हा ऋषिकेशने तिरंगा फडकावला, तेव्हा त्या क्षणी फडफडणाऱ्या ध्वजासोबत त्याचे अनेक वर्षांपासून जपलेले स्वप्नही उंच भरारी घेत होते. हा क्षण पाहणाऱ्या प्रत्येकाच्या डोळ्यांत अभिमान आणि आनंदाचे अश्रू उभे



राहिले.रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यात राहणाऱ्या या जिद्दी तरुणाचे कळसुबाई सर करण्याचे स्वप्न बऱ्याच दिवसांपासून मनात होते. शारीरिक वेदना, डॉक्टरांच्या सूचना, समाजातील शंका... या सर्वांच्या पलीकडे त्याची इच्छा मात्र अधिक प्रबळ होती. शिव ऊर्जा प्रतिष्ठानची प्रेरणा, पालकांनी दिलेली आधाराची ताकद, आणि स्वतःच्या अढळ जिद्दीच्या बळावर त्याने या कठीण आणि धोकादायक मोहिमेला सुरुवात केली.

कळसुबाईचा प्रवास हा साधा नाही ,खाचखळगे असलेले दगडी मार्ग, खोल दरीच्या काठावरून जाणाऱ्या अरुंद लोखंडी शिड्या, ८०-९० अंशाचा चढण-उतार, पाय घसरला तर जीव धोक्यात येईल असे मातीचे उतार ही सर्व आव्हाने पाहून अनेक सक्षम गिर्यारोहकही दचकल्याशिवाय राहत नाहीत.पण ऋषिकेश मात्र थांबला नाही. प्रत्येक पावलावर वेदना, प्रत्येक वळणावर भीती, पण प्रत्येक क्षणी त्याची जिद्द त्याला पुढे घेऊन जात होती.त्याच्या पावलात कधीकधी थरथर होती, पण मनात मात्र पर्वत जिंकण्याची आग प्रज्वलित होती. आणि अखेर, अविरत प्रयत्नांनंतर त्याने कळसुबाईच्या शिखरावर पाऊल ठेवले सेरेब्रल पाल्सी असतानाही शिक्षणात त्याने उत्तुंग यश मिळवले. रसायनशास्त्र विषयात पदवी, औषधशास्त्र पदविका आणि नुकताच संभाजीनगर येथे झालेल्या पॅराऑलिम्पिक जलतरण राज्यस्तरीय स्पर्धेत मिळवलेला तिसऱ्या क्रमांकाचा मान — हे त्याच्या क्षमतेचे द्योतक आहे. "ऋषिकेशला आम्ही जमेल ते सर्व दिले. प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांना संधी द्यावी. अपंगत्व हा अडथळा नसतो... योग्य साथ मिळाली तर प्रत्येक मूल काहीतरी विलक्षण करू शकते," असे त्यांच्या आई सौ. शितल माळी यांनी सांगताना भावना दाटून आल्या. या ऐतिहासिक. स्विमिंग कोच अर्जुन सोनकांबळे (नाशिक), बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिजामाता तरण तलाव व्यवस्थापक सौ. माया जगताप, पी. एन. पी. एज्युकेशन सोसायटी कार्यवाह सौ. चित्रलेखा पाटील, शाळा चेअरमन समीर बनकर, फजल हलडे, राजाराम धुमाळ, रमेश शेठ जैन, नारायणसिंग राजपूत, तसेच वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यांनी अभिनंदन व्यक्त केले. गिर्यारोहणासाठी मिळालेले ज्ञानेश्वर खाडे (बारी/कळसुबाई) यांचे मार्गदर्शनही अत्यंत महत्त्वाचे ठरले. ऋषिकेशची ही कहाणी केवळ दिव्यांगांसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे..

## वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराबाबत महिला ग्रामस्थांच्या तक्रारी : उपसंचालक प्रशांत पाटील यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**महेश साळुंके लासलगाव प्रतिनिधी**

: लासलगाव येथील ग्रामिण रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या व कर्मचारी यांच्या मनमानी कारभार व अरेरारेवी भाषाला कंटाळून लासलगाव महिला ग्रामस्थांच्या वतीने मुख्य प्रशासकीय अधिकारी वर्ग-१ उपसंचालक प्रशांत पाटील यांना लेखी तक्रार करण्यात आली. संबंधित पूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल असे आश्वासन उपसंचालक पाटील यांनी दिले.

**काय आहे प्रकरण**

कुमावत कविता अरूण रा.विंचुर ता.निफाड जि-नाशिक यांचा चिरंजीव



सोहम अरुण कुमावत याच्या उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय लासलगाव येथे आले असता डॉक्टरांनी त्यास ॲडमिट करून घेतले. सलग 2 दिवस मुला वर उपचार होऊन देखील त्याची प्रकृती स्थिर होत नसल्याचे निदर्शनास आले सलाईन मध्ये कोणत्याही प्रकारचे इजेक्शन सोडण्यात येत नव्हते याची विचारपूस केली असता तेथील नर्स उच्च आवाजात म्हणाल्या तुम्ही आम्हाला काही शिकाऊ नका आम्ही इंजेक्शन टाकत आहोत. ह्या घटनेची तक्रार डॉक्टर कडे केली असता डॉक्टरानी काही न ऐकता विश्वास नसल तर आमच्या हॉस्पिटलला यायचे नाही. आरेरावीच्या भाषेत तु कुठली आहे काठुन आली. पोलिस बोलून ह्या बाईला पोलिसांच्या ताब्यात द्या असे बोलण्यात आले. संबंधित डॉक्टर आणि नर्सवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी समाजसेविका फरीदा काझी ,कविता कुमावत उषा कुमावत, अर्चना कुमावत आदी यांनी केली आहेत.

> ग्रामीण रुग्णालय लासलगाव येथे वारंवार असे प्रकार घडत आहे. वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या व कर्मचारी यांच्या मनमानी कारभार व अरेरारेवी भाषाला गोरगरीब कंटाळून गेले आहेत म्हणुन यासाठी उपसंचालक यांना तक्रार करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे
>
> – फरीदा काझी, समाजसेविका

## भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी घेतली गृहमंत्री अमित शाहांची भेट



**दिल्लीत मध्यरात्री उशिरा गृहमंत्री अमित शाहांबरोबर संघटनात्मक चर्चा केली आगामी निवडणुका तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात झालेल्या चर्चेनंतर चव्हाण शाहांच्या भेटीला फडणवीस आणि शिंदे यांच्यातील आगामी निवडणुकीसंदर्भात झालेल्या चर्चेचा सारांश शाहांकडे सोपवण्यात आल्याची सूत्रांची माहिती**

**( दैनिक युवक आधार )**

## सुरगाणा महाविद्यालयात जागतिक मानवी हक्क दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** जगभरात १० डिसेंबर हा दिवस जागतिक मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त राज्यशास्त्रविभाग विशाखा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख व्याख्याते प्रा. सुभाष पवार यांनी मानवी हक्कांच्या संदर्भात राजकीय विचारवंतांचे हक्काबाबतचे विचार स्पष्ट केले. मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्र संघाचे योगदान सांगून भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची माहिती दिली. तसेच भारतातील हक्कांची वास्तव परिस्थिती कशी आहे याचा आढावा घेऊन स्त्रियांचे हक्क, बालकांचे हक्क व वंचितांचे हक्क याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर



यांनी आज मानवी हक्क व अधिकार अबाधित ठेवण्याची गरज आहे. आपले हक्क व अधिकार बजावत असताना इतरांच्या हक्काची पायमल्ली होणार नाही याची प्रत्येकाने दखल घेतली पाहिजे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्राचे विभाग प्रमुख प्रा. सुरेश भोये यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले तर आभार डॉ. चंद्रकांत पाटील यांनी मानले सदर कार्यक्रमास डॉ. रविंद्र हिरे, डॉ. संतोष पवार प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंडसइंड बँक जिओ-बीपी मोबिलिटी+' क्रेडिट कार्ड लाँच

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** इंडसइंड बँक आणि जिओ-बीपी यांनी संयुक्तपणे 'इंडसइंड बँक जिओ-बीपी मोबिलिटी+ क्रेडिट कार्ड' लाँच केल्याची घोषणा आज केली. इंडसइंड बँकेचे पहिले इंधन-केंद्रित कार्ड आणि जिओ-बीपीचे पहिले सह-ब्रँडेड क्रेडिट कार्ड म्हणून ही ऑफरिंग बाजारपेठेत सादर करण्यात आली असून, देशातील 'ऑन-द-गो' ग्राहकांना अधिक फायदेशीर, सोयीस्कर आणि रिवॉर्ड-समृद्ध अनुभव देण्याच्या उद्देशाने हे कार्ड डिझाइन करण्यात आले आहे.

रुपे नेटवर्कद्वारे समर्थित हे नवे मोबिलिटीप्लस क्रेडिट कार्ड जिओ-बीपीच्या २०५० पेक्षा अधिक मोबिलिटी स्टेशन्सवर उपलब्ध असलेल्या फ्युएल रिवॉर्ड्ससह प्रीमियम लाइफस्टाइल बेनिफिट्स




**इंधन खर्चात मोठी बचत – लाइफस्टाइल रिवॉर्ड्सची जोड**

आणि यूपीआय-आधारित पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देते. त्यामुळे ही ऑफरिंग आपल्या प्रकारातील अत्याधुनिक आणि अनोखी ठरते. रुपे-आधारित यूपीआय व्यवहारांसह अखंड, जलद आणि सुरक्षित डिजिटल पेमेंट अशा सुविधा आणि खरेदीवर रिवॉर्डचे फायदे उपलब्ध करण्यात आले आहेत. इंडसइंड बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ राजीव आनंद यांनी सांगितले कि, जिओ-बीपीसोबतची भागीदारी आमच्या ग्राहक-केंद्रित नवकल्पनांचे प्रतीक आहे. हे कार्ड आधुनिक, गतिमान ग्राहकांसाठी स्मार्ट आणि फायदेशीर मोबिलिटी अनुभव देण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देते. जिओ-बीपीचे चेअरमन सार्थक बेहुरिया म्हणाले, आमचा उद्देश आहे ग्राहकांचा प्रवास अधिक सोयीस्कर, रिवॉर्ड-समृद्ध आणि डिजिटल-चालित बनवणे. हे क्रेडिट कार्ड त्याच दिशेने एक पाऊल आहे. जिओ-बीपीचे सीईओ अक्षय वाधवा यांनी म्हंटले की, या कार्डद्वारे ग्राहकांना दरवर्षी ६० लिटरपर्यंत मोफत इंधनाचे मूल्य मिळू शकते आणि जिओ-बीपीवर प्रत्येक फ्युएलिंगवर ४. २५ टक्के पर्यंत मूल्य परतावा मिळतो. यूपीआय सुविधा आणि ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी फ्युएल्समुळे हा अनुभव अधिक भविष्यवादी बनतो.

## सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन, डिझेल इंजिन देखभाल व परिचालन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता इच्छुकांनी अर्ज करावेत

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे :** मत्स्यव्यवसाय विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सहा महिने मुदतीचे सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन, डिझेल इंजिन देखभाल व परिचालन या प्रशिक्षणाच्या दि.01 जानेवारी 2026 पासून मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र रायगड-अलिबाग येथे सुरु होणाऱ्या प्रशिक्षण सत्रासाठी रायगड जिल्ह्यातील युवकांनी दि.31 डिसेंबर 2025 पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी महेश खरात यांनी केले आहे.

या प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण केंद्राच्या 57 फूट लांबी असलेल्या 63.35 टनेज क्षमतेच्या सिलेंडर संख्या 6 व 205 अश्वशक्तीचे इंजिन असलेल्या "मत्स्यप्रबोधिनी" नोंदणी क्र. IND-MH-3-MM-4266 या प्रशिक्षण नौकेद्वारे सागरी सफरीवर नेऊन प्रात्यक्षिक व सिध्दांतिक ज्ञान दिले जाणार आहे.

त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे- प्रशिक्षण कालावधी दि.01 जानेवारी 2026 ते दि.30 जून 2026 (6 महिने) आवश्यक पात्रता- उमेदवाराचे वय 18 ते 35 वर्ष असावे, (आधारकार्ड व रेशनकार्ड छायाप्रत जोडणे),



उमेदवार किमान चौथी पास असणे आवश्यक, (शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायाप्रत जोडणे), क्रियाशील मच्छिमार व किमान एक वर्ष मासेमारीचा अनुभव असावा, (विहित नमुन्यातील अर्जावर मच्छिमार सहकारी संस्थेची शिफारस घ्यावी), उमेदवारास पोहता येणे आवश्यक आहे. प्रशिक्षण शुल्क- प्रतिमहा रुपये 450/- प्रमाणे सहा महिन्यांचे रु.2 हजार 700 मात्र, दारिद्रय रेषेखालील असल्यास प्रतिमहा रुपये 100/- प्रमाणे सहा महिन्यांचे रुपये 600/- मात्र, (दारिद्रय रेषेखालील उत्पन्नाचा गटविकास अधिकारी यांचा दाखला जोडावा)

रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी- राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) अंतर्गत योजनेतून अर्थसहाय्य घेऊन मच्छिमारी नाव बांधता येते. सरकारी किंवा खाजगी विभागांच्या सागरी नौकांवर पात्रतेनुसार खलाशी म्हणून रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते.

इच्छुक युवकांनी या प्रशिक्षण केंद्रातील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, महेश खरात, मो.क्र.7758969112 किंवा यांत्रिक निदेशक धीरज भोयर किंवा मोबाईल व व्हॉट्सअप क्र. 9860254943 वर संपर्क साधल्यास विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात भरुन त्यावर संस्थेची शिफारस घेवून दि.31 डिसेंबर 2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी मत्स्यसंकुल इमारत, अलिबाग कोळीवाडा, कस्टम कार्यालयाच्या बाजूला ता.अलिबाग या पत्त्यावर अथवा ftoalibag@redif-fmail.com या ई-मेलवर सादर करावेत.

## रक्तदान शिबिरास रक्तदात्यांकडून अभूतपूर्व प्रतिसाद - उरण मध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त रक्तदान

**दैनिक युवक आधार**

**उमाकांत पानसरे :** कोणावरही रक्त घेण्याची वेळ येऊ नये परंतु आयुष्याच्या काही कठीण प्रसंगी प्रत्येकाच्या जीवनात स्वतःसाठी किंवा स्वतःच्या प्रिय असणाऱ्या व्यक्तीसाठी रुग्णालयातील रुग्ण म्हणून रक्त घ्यावे लागते आणि म्हणूनच आयुष्यातील सर्वात श्रेष्ठ दान जर कुठलं असेल तर ते आहे *रक्तदान* म्हणजेच जीवनदान आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो या उदात्त भावनेने आज, दिनांक 10 डिसेंबर 2025 रोजी शिवसेना एम्पलोयीज युनियन ओ.एन.जी.सी आणि अपोलो हॉस्पिटल नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ओ.एन.जी.सी उरण प्लांट येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलं होतं.




सकाळी सात वाजता सुरू झालेलं रक्तदान शिबिर विविध सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक तसेच व्यावसायिक यांच्या सहभागाने सुमारे 1000 च्या पुढे नागरिकांनी रक्तदानासारखं पवित्र काम करून सामाजिक बांधिलकी जपण्याचं काम केलं आहे. उरण तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशनचे सन्माननीय फार्मासिस्ट आणि उरण परिसरात प्रसिद्ध गायक असणाऱ्या श्री. बाळू घाळवट तसेच सौ. प्रज्ञा राजेश्वर गावंड आणि उरण तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशनचे सचिव फार्मासिस्ट श्री. राजेश्वर गावंड यांनी सुद्धा रक्तदान करून उरण तालुक्याची सामाजिक बांधिलकी जपण्याचं महत्त्वाचं काम करून ' रक्तदान करा जीवन वाचवा ' अशा प्रकारचा महत्त्वाचा संदेश या निमित्ताने अधोरेखित करत आहेत.

# कडाक्याच्या थंडीत, पहाटेच्या अंधारात... 'कोयत्या'च्या धारेवर जगण्याची लढाई!

## ऊसतोड मजुरांचा थरार! गोड साखरेमागील 'कडू' संघर्ष

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:** थंडीचा कडाका वाढला आहे. पहाटेची वेळ आहे. सूर्य उगवलेला नाही, आणि हाडे गोठवणारी थंडी सगळीकडे पसरलेली आहे. अशा वेळी, शहरातील लोक आपल्या उबदार पांघरुणात शांत झोपलेले असताना, शेकडो किलोमीटर दूरून आलेल्या ऊसतोड मजुरांची जीवनयात्रा मात्र सुरू झालेली असते.





हातात धारदार कोयता आणि मनात कुटुंबाच्या पोटाची भूक घेऊन, हे कष्टकरी आपला मुक्काम असलेल्या फडावर पोहोचतात. पहाटेचे ५ वाजले असतील. गोठवणारी हवा शरीरात घुसतेय, पण या मजुरांना त्याची पर्वा नाही. साखर कारखान्यांच्या 'सायरन'चा आवाज त्यांच्यासाठी कामाच्या सुरुवाताची आणि जगण्याची हाक असतो.

**पहाटेच्या अंधारातील संसार**

जिथे ऊसतोडणी सुरू आहे, त्याच शेताच्या बांधावर किंवा मोकळ्या जागेत तात्पुरत्या निवारामध्ये त्यांचा संसार मांडलेला असतो. ही त्यांची ६ महिन्यांची 'कर्मभूमी' आणि 'घर' असते. थंडीपासून बचावासाठी केलेला शेकोटीचा छोटासा धूर अंधारात विरून जातो आणि कामाची लगबग सुरू होते.

पुरुषांसोबतच महिला मजूर देखील खांद्याला खांदा लावून काम करतात. पहाटे ऊस तोडण्यापासून ते त्याची 'साळणी' (पाने काढणे) करून, मोळ्या बांधणे आणि त्या ट्रॉली किंवा बैलगाडीत भरणे, हे सर्व काम ते बारा-पंधरा तास अविरत करतात. या कष्टांमध्ये त्यांच्यासोबत त्यांची लहान मुले देखील असतात. थंडीच्या तडाख्यातून लेकरांचा बचाव करण्यासाठी त्यांच्या माता त्यांना उसाच्या पाचटाच्या ढिगाऱ्यामागे, किंवा तात्पुरत्या पाळण्यात ठेवून काम करतात. ऊसाच्या फडातच ही चिमुकली ऊन, वारा आणि थंडी अनुभवत मोठी होतात.

**कष्ट हीच पूजा, कर्ज हेच वास्तव**

मूळतः दुष्काळी भागातून स्थलांतरित झालेले हे मजूर, भूमीहीन असल्याने पोटाची खळगी भरण्यासाठी इथवर येतात. 'टोळी'ने काम करणारे हे मजूर दररोज अडीच ते तीन टन ऊस तोडतात. त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग त्यांना कारखान्यांकडून घेतलेल्या 'उचल' (ॲडव्हान्स) रकमेची परतफेड करण्यात खर्च होतो.

किरण पाडळे या मजुराकडून झालेल्या संवादात ते सांगतात, "रोजंदारीवर दुसरीकडे ५०० रुपये मिळतात, पण इथं 'जोडी'ला (पती-पत्नी) मिळून दिवसाकाठी तेवढेच मिळतात. तरीपण, दुसरीकडे काम नाही, म्हणून इथं येतो. कष्ट हेच आमचं भांडवल आहे . कष्ट केलं की रात्री सुखाची झोप लागते, यातच समाधान आहे."

**मुलांच्या शिक्षणाची आबाळ**

या जीवनसंघर्षात सर्वात मोठी किंमत चुकवावी लागते ती त्यांच्या मुलांना. स्थलांतरामुळे त्यांची शाळा सहा महिन्यांसाठी थांबते. या मुलांना शाळेच्या शिक्षणाऐवजी, ऊसतोडीच्या कामाचे प्राथमिक धडे गिरवावे लागतात, ज्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होते. शासनाच्या वसतिगृह योजना आहेत , पण माहिती अभावी किंवा इतर अडचणींमुळे अनेक मुले त्यापासून वंचित राहतात.

कडाक्याच्या थंडीत ऊसतोडीसाठी निघालेला 'कोयत्या'चा प्रत्येक घाव हा केवळ ऊसावर नसतो, तर कुटुंबाच्या भविष्यासाठी आणि पोटाच्या भुकेसाठी दिलेली लढाई असते. आपल्या ताटात येणाऱ्या गोड साखरेमागे या ऊसतोड मजुरांचे कडू आणि संघर्षमय आयुष्य दडलेले आहे, याची जाणीव वाचकाला करून देणारी ही पहाट आहे.

---

## भवानीनगर येथील हायस्कूलच्या मुलींनी बनवल पिठलं भाकरी

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथील श्री छत्रपती मुलींचे हायस्कूल येथे बुधवार दि 10 डिसेंबर रोजी हायस्कूलच्या कवायत ग्राउंडवर इयत्ता नववी व दहावीच्या मुलींनी स्वतः पिठलं भाकरी बनवण्याची पाककला घेण्यात आली.



मागील आठवड्यात लहान गटातील इयत्ता पाचवी ते आठवी मधील मुलींना कश्या पद्धतीने भज्जे बनवतात याची पाककला शिकवण्यात आली होती.मुलींना शिक्षणाबरोबर घरातील स्वयंपाक सुद्धा करता यावा म्हणून हा उपक्रम राबविण्यात आला असल्याची माहिती मुख्याध्यापिका गोरे मॅडम यांनी सांगितले.या उपक्रमासाठी पार पाडण्यासाठी देवकाते मॅडम घुले मॅडम फुके मॅडम रायते मॅडम पुजारी मॅडम भिसे मॅडम मुळीक ढमढेरे मॅडम कोळेकर मॅडम निंबाळकर सर कारंडे सर मासाळ सर शिंगाडे सर संगम खवळे यांनी परिश्रम घेतले यावेळी मुलींना मार्गदर्शन मुलांच्या हायस्कूलचे राऊत सर यांनी केले तर आभार रायते मॅडम यांनी मानले.

---

## जयराम स्वामी विद्यामंदिर वडगाव : माजी विद्यार्थी संघ स्थापनासाठी २५ डिसेंबरला बैठक

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे** : जयराम स्वामी विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज वडगाव येथे शासकीय नियमांनुसार माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या संघात शाळेत शिक्षण घेतलेला कोणताही माजी विद्यार्थी सहभागी होऊ शकणार आहे, अशी माहिती मुख्याध्यापक व प्राचार्य जे. बी. घार्गे यांनी दिली.




माजी विद्यार्थी संघाच्या निवडीसाठीची महत्त्वपूर्ण बैठक गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ रोजी, सकाळी ११ वाजता शाळेत आयोजित करण्यात आली आहे.

मुख्याध्यापक घार्गे यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे की, शाळेच्या भविष्योन्नतीसाठी आणि मजबूत माजी विद्यार्थी नेटवर्क उभारण्यासाठी जास्तीत जास्त उपस्थित राहावे. शाळेच्या शैक्षणिक परंपरेला नवे बळ देण्यासाठी हा उपक्रम मोलाचा ठरेल, असा विश्वास शाळा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

---

# पालखी महामार्गाचे काम बंद : सणसर ग्रामस्थांचा तीव्र विरोध सणसर येथील रस्त्याचा प्रश्न गंभीर

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** सणसर गावातील संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे गेले दोन-तीन वर्षांपासून रखडलेले काम आणि अंडरपास,सेवा रस्ता अशा वेगवेगळ्या समस्यांसाठी सणासरच्या ग्रामस्थांनी बुधवारी प्रकल्प अधिकाऱ्यांना प्रश्नांचा भडीमार करत धारेवर धरले.मागील पंधरा दिवसांपासून सणसरच्या ग्रामस्थांनी पालखी महामार्गाचे काम सणसर हद्दीत बंद केले आहे.

दरम्यान,पालखी महामार्गाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेतले.यावेळी श्री छत्रपती कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक हेही उपस्थित होते.जाचक यांनी सणसर बरोबरच भवानीनगर येथील पुलाचा प्रश्न मांडला. पालखी महामार्गाला लासुर्णे पासून भवानीनगर असा सलग सेवा रस्त्याची गरज आहे.पूर्वीचा अंडरपास गावाच्या बाहेर घेतला.पालखीचा विचार केला नाही. हा सर्व प्रकार गावकऱ्यांना विश्वासात न घेता.रस्त्याची परिपूर्ण माहिती न दिल्यामुळे गावकरी अंधारात राहिले.काम पुढे गेले आहे.प्रकल्प अधिकाऱ्यांच्या समोर सणसर येथे प्रकल्प अधिकाऱ्यांच्या समोर बाजू मांडताना पृथ्वीराज जाचक व शरद कांबळे शब्बीर काझी हानीफ तांबोळी यांनी चुकांचा त्रास गावकऱ्यांना होत असल्याचे यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले



प्रकल्प बनतताना रस्त्याची उंची,चुकीची गटार लाइन,रस्त्यावरची कळणे चुकीची आहेत.अंडरपासची उंची कमी असल्याने वाहतुकीचे ट्रॅक्टर,उसाच्या बैलगाड्या या रस्त्याच्या पलीकडे नेण्यास अडचण निर्माण होणार आहे.यावेळी सरपंच यशवंत नरुटे पाटील,पार्थ निंबाळकर शिवाजी काळे मंगेश काळे पिंटू गुप्ते बजरंग रायते विशाल पाटील किरण गायकवाड शाम सोनवणे राहूल जगताप सागर गुप्ते यांनी वेगवेगळे मुद्दे मांडले

सरपंच यशवंत पाटील गावातील असणाऱ्या अडचणी सांगत असताना प्रकल्प अधिकारी केशव घोडके यांनी सरपंच यशवंत पाटील यांना चर्चेवेळी वेगळी वागणूक देण्याचा प्रयत्न करण्याचा प्रयत्न केला त्यावर सरपंच यशवंत पाटील यांनी प्रकल्प अधिकारी केशव घोडके यांची चांगलीच कानउघाडणी केली आणि यावेळी ग्रामस्थ व प्रकल्प अधिकारी यांच्यात जोराची शाब्दिक चकमक झाली.

पूर्वी धरणाची जागा सुद्धा बदलली होती.उजनी धरणाच्या निर्मिती वेळी नियोजित धरण वेगळ्या ठिकाणी होते.परंतु लोक भावनेचा,शेतकऱ्यांच्या नुकसानीचा विचार करून धरणाची जागा बदलली.हा तर फक्त रस्त्यावरच्या पुलाचा प्रश्न आहे.अधिकाऱ्यांनी या समस्येवर वेळीच विचार करायला पाहिजे होता,पण अजूनही वेळ गेलेली नाही. उपमुख्यमंत्री,कृषीमंत्री व ग्रामस्थ यांच्या समवेत एक बैठक लावून या प्रश्नाची उकल करावी लागेल,असे छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी सांगितले.

पाणीपुरवठा लाइन जोडून न देणे,गटार लाइन चुकीच्या पद्धतीने करणे,चेंबर आणि खड्डे खणून ठेवले आहेत. अशा प्रश्नांची सरबत्ती माजी उपसरपंच अभयसिंह निंबाळकर यांनी केली.यावर अधिकाऱ्यांनी केंद्राला ग्रामस्थांच्या मागण्यांचा प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याचे सांगितले.मुस्लिम दफनभूमीबाबत शब्बीर काझी, हानीफ तांबोळी यांनी अडचणी सांगितल्या.

---

## उरण शहरात खिडकोळी नाक्यावर अग्नी तांडव

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : आजदुपारी4वाजण्याच्या सुमारास उरण मधील खिडकोळीनका(राजपालनका) येथील गुलजार भाटकर यांच्या राहत्या घराला आग लागली असूनसुमारे 75 वर्षापेक्षाहि जुने असणारे हे घर पूर्णताः लाकडी असल्याने आगीने उग्र रूपधारण केले होते.आग लागल्याची खबर मिळताच सिडकोचे अग्निशमनदलाची गाडी पाठोपाठ ओएनजीसी अग्निशमनदलाची गाडी आणि दाखल झाली शर्तीचे प्रयत्न करूनही आगअखेर नियंत्रणाखाली आली आहे.सुदैवानेया आगीत जीवितहानी झालेली नही. या इमारतीच्या तळमजल्यावर अशोक राजपाल यांचे इलेट्रिकव



इलेट्रोनीक्स समान ठेवण्याचे गोदाम होते.येथील उपस्थित नागरिकांच्या म्हणण्यानुसार या गोदामात शॉर्टसर्किटमुळे मुले आग लागली या अगोदरसुमारे 10ते15 वर्षापूर्वी याचगोदामाला आग लागण्याची घटना घडली होती.

या आगीत मोठ्या प्रमाणात वित्तहानी झालेली नसून, संपूर्णघर जाळून खाक झाले आहे. आगीचे कारणअजूनही स्पष्ट झलेनाही उरण पोलीस यंत्रणा व सिडको अग्निशमनदल सखोलपणेचौकशी करीत आहेत

---

# हिवाळी अधिवेशनाच्या नजरेतून

## ११ वेळा आमदारपण हृदयातून “ जनतेचा माणूस “- स्व लोकनेते गणपतराव देशमुख

**संजीव भांबोरे(नागपूर) :** महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात सत्ता, पक्ष, राजकीय समीकरणे, सुविधा आणि तामझाम यांची गर्दी दिसते. चमचमत्या गाड्या, सुरक्षा तुकड्या, मोठे तळ टाकलेले कॅम्प… या सर्वांमध्ये एका व्यक्तिमत्त्वाची उणीव प्रकर्षाने जाणवते—स्व. गणपतराव देशमुख, साधेपणाने लोकसेवा करण्याची शिकवण देणारे महाराष्ट्रातील खरे लोकनायक.



अधिवेशनात सत्तेचे आवाज मोठे असतात; पण देशमुख साहेब म्हणजे सत्तेपेक्षा मूल्यांचा आवाज. आज ते आपल्या सोबत नसले तरी त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांचा साधेपणा आणि त्यांनी जगलेली लोकसेवेची परंपरा अधिवेशनात उपस्थित असलेल्या प्रत्येक लोकप्रतिनिधीला अंतर्मुख करते.

**“लक्झरी गाडी कधीच नाही… एसटीच्या तिकिटावरच प्रवास!”**

सत्ता मिळाल्यावर होणारा दिखावा हा राजकारणाचा एक ‘अलिखित नियम’ झाल्यासारखे आहे. मात्र देशमुख साहेबांनी हा नियमच मोडून काढला.

ते एसटी बसनेच प्रवास करायचे; शासकीय गाड्यांचा तामझाम नाकारायचे,आणि जनतेच्या नजरेला भिडणाऱ्या साध्या वेशातच लोकांच्या दु:खात–सुखात स्वतः सहभागी व्हायचे.

त्यांच्यासाठी ‘आमदारपद’ हे विशेषाधिकारांचे दार नव्हते; तर जनतेची जबाबदारी स्वीकारण्याची शपथ होती.

**लोकशाहीचे खरे रक्षक**

लोकशाहीची जपणूक कागदोपत्री नियमांनी नव्हे, तर नेत्यांच्या आचरणाने होते—हे गणपतराव देशमुख साहेबांनी जगून दाखवले.

त्यांनी मतदारांना कधीही ‘संख्या’ मानले नाही,

सत्तेपेक्षा प्रश्नांचे प्राधान्य दिले आणि राजकारणात पारदर्शकता व प्रामाणिकपणाला सर्वोच्च स्थान दिले. अशा नेत्यांची आज मोठी टंचाई जाणवते. म्हणूनच आजची जनता चातक पक्षाप्रमाणे पुन्हा अशाच लोकनायकांच्या शोधात आहे.

**११ वेळा सलग निवडून येण्यामागे ‘कार्य’, नव्हे ‘प्रचार’**

सांगोला मतदारसंघातून सलग ११ वेळा आमदार—ही केवळ एक आकडा नाही;ही त्यांच्या कामाची पावती,त्यांच्या स्वच्छ प्रतिमेची मान्यता,आणि त्यांच्या जनतेशी असलेल्या नात्याची ताकद आहे.आजच्या काळात प्रचारयंत्रणा, सोशल मीडिया, चमकदार आश्वासने यांचा काळ आहे;पण देशमुख साहेबांचा काळ ‘काम बोलते’ या तत्त्वाचा होता—आणि आजही तोच आदर्श ठरतो.

**आजच्या नेत्यांना आदर्श दाखवणारे नेतृत्व**

हिवाळी अधिवेशनात जेव्हा मंत्र्यांचे, नेत्यांचे, आमदारांचे काफिले धावताना दिसतात, तेव्हा एक प्रश्न नजरेसमोर येतो—

सत्ता अधिक महत्त्वाची, की लोकसेवा?

आणि त्याच वेळी आठवण होते त्या व्यक्तिमत्त्वाची, जो पदावरून नव्हे, तर खोलवरच्या समर्पणातून मोठा झाला,

साधेपणातून तेजस्वी ठरला,आणि आपल्या वागण्यानेच नेतृत्वाला चारित्र्य दिले.त्या व्यक्तिमत्त्वाचे नाव—गणपतराव देशमुख.

**जनतेच्या हृदयात अजरामर**

३० जुलै २०२१ रोजी वयाच्या ९४व्या वर्षी त्यांचे निधन झाले. परंतु त्यांनी जपलेली मूल्ये, त्यांनी दिलेली लोकसेवेची शिकवण आजही जिवंत आहे.

त्यांचे जीवन हे सांगते—नेतृत्व गाडी, सुरक्षा, स्टाफ यात नसते;

नेतृत्व जनतेच्या मनात जगण्यात असते.

हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने अंतर्मुख करणारी जाणीव

उपराजधानीत चाललेल्या चर्चांमध्ये, ठरावांमध्ये, घोषणांमध्ये एक गोष्ट मात्र नक्की—जर आज देशमुख साहेबांसारखे नेते असते,तर मूल्याधारित राजकारणाची उभी परंपरा अजूनही प्रखरपणे जपली गेली असती.

अधिवेशनातील गोंगाटात त्यांचा शांत, संयमी, सत्यनिष्ठ आवाज जरी ऐकू येत नसला तरी,त्यांचे कार्य आजही प्रत्येक लोकप्रतिनिधीला मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ आहे.

**---राहूल डोंगरे ---**
**पारस निवास तुमसर, जि. भंडारा.**
**मो. न.९४२३४१३८२६**

**लोकनेते स्व.गणपतराव देशमुख आमदार**

---

## मनसेचे आंदोलन स्थगित, पनवेल तालुक्यात लवकरच होणार श्वान निर्बीजीकरणाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल मनसे तालुका उपाध्यक्ष सुजित सोनवणे यांनी पनवेल तालुक्यातील भटक्या श्वानांचा बंदोबस्त करून निर्बीजीकरण करण्याची मागणी केली होती. ते न झाल्याने या विरोधात 12 डिसेंबर रोजी आंदोलन करण्यात येणार होते. मात्र चार आठवड्यांच्या कालावधी दरम्यान श्वान निर्बीजीकरणाला सुरुवात होणार असल्याची माहिती गटविकास अधिकारी, पंचायत समिती पनवेल यांनी दिल्याने मनसेचे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. त्यामुळे मनसेच्या मागणीला यश येणार आहे.पनवेल तालुक्यातील गावांमध्ये भटक्या कुत्र्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले आहे. भटके कुत्रे नागरिकांचे लचके देखील तोडत आहेत. वाढत्या कुत्र्यांच्या प्रमाणामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. अनेक ठिकाणी लहान मुले, पुरुष, महिला यांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेला आहे. या प्रकरणी मनसेचे पनवेल तालुका उपाध्यक्ष सुजित पावलस सोनवणे यांनी गटविकास अधिकारी पनवेल यांना श्वानांचा बंदोबस्त करण्यासाठी पत्र व्यवहार केला होता. मात्र उपाययोजना न झाल्याने 12 डिसेंबर रोजी आंदोलन करणार असल्याचे सोनवणे यांनी सांगितले. दरम्यान ॲनिमल बर्थ कंट्रोल कार्यक्रमासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे बाबत संचालक सिडको भवन, बेलापूर यांना पत्र व्यवहार करण्यात आला आहे. युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी आष्टी ही संस्था पुढील चार आठवड्यांच्या कालावधी दरम्यान श्वान निर्बीजीकरनाचे काम सुरू करणार असल्याची माहिती सुजित सोनवणे यांना पंचायत समितीतर्फे देण्यात आली आहे. श्वान निर्बीजीकरणाला लवकरच सुरुवात होणार असल्याने आणि मनसेच्या मागणीला यश येणार असल्याने मनसेचे 12 डिसेंबर रोजीचे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा ग्रामीण कृषी कार्यानुभव उपक्रम; धारणगाव वीरमध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**आधुनिक शेती, माती परीक्षण, पिक व्यवस्थापनासह विविध कृषी संधींबाबत थेट संवाद; दहा आठवडे उपक्रम राबविणार**

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** माविप्रच्या चाचडगाव येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत धारणगाव वीर येथील नागरिक व शेतकऱ्यांशी संवाद साधत ग्रामपंचायतीचे विकास उपक्रम, आधुनिक शेती पद्धती आणि कृषी क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन केले.

ग्रामीण शेतीची व्यावहारिक ओळख व स्थानिक विकास उपक्रमांचा प्रत्यक्ष अनुभव हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी थेट चर्चा करून पिक व्यवस्थापन, माती परीक्षण, कीडनियंत्रण, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, जलसंधारण व कृषी विस्तार सेवांबाबत माहिती दिली.




तसेच विविध अडचणींवर उपाययोजना सुचवून शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण केली.

विद्यार्थ्यांचे स्वागत सरपंच दीपक सोनवणे व उपसरपंच सोमनाथ गंभीरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमात कृषी महाविद्यालयातील चौथ्या वर्षाच्या विद्यार्थिनी गौरी घारे, श्रुती घोरपडे, स्नेहा जाधव, आरती जगताप, संस्कृती कांगणे, दर्शना कुलथे व स्मृती लगड सहभागी आहेत.

हे विद्यार्थी दहा आठवडे धारणगाव वीर येथे कार्यरत राहणार असून त्यांच्या सहभागामुळे गावातील कृषीविषयक उपक्रमांना नवीन दिशा मिळेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# ओएनजीसी उरण प्लांट वतीने रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : बुधवार दिनांक १० डिसेंबर रोजी उरण येथील ओएनजीसी उरण प्लांट च्या वतीने ओएनजीसी द्रोणागिरी भुवन उरण येथे सकाळी ७ ते सायंकाळी६ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते एकूण १००८ रक्तदात्यांनी यावेळी रक्तदानाचे दातृत्व केले.




रक्तदान हे जीवन वाचवणारे एक महत्त्वपूर्ण कार्य आहे. ज्यामुळे अनेक गंभीर आजारी, रुग्ण ,अपघात , आणि शस्त्रक्रिया झालेल्यांना मदत मिळते .एका दानातून तीन रुग्णांचे प्राण वाचू शकतात. आणि दात्यालाही हृदयविकाराचा धोका कमी होणे, आरोग्य तपासणी मिळण्याचे फायदे मिळतात ,कारण मानवी रक्ताला पर्याय नाही आणि त्याची गरज नेहमीच असते .अपघात, शस्त्रक्रिया, कर्करोग , रक्ताचे आजार आणि प्रसूती दरम्यान माता व बाळाचे प्राण वाचवण्यासाठी रक्त आवश्यक असते, रक्तदात्यासाठी रक्ताचे लोहाचे पातळी नियंत्रित राहते, आणि हृदयविकाराचा झटका व स्ट्रोकचा धोका कमी होतो. रक्ताची जाडी कमी होते. रक्ताभिसरण सुधारते दात्याला रक्तदाब, हिमोग्लोबिन आणि इतर चाचण्यांमधून मोफत आरोग्य तपासणी मिळते.

ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिती, ओएनजीसी कर्मचारी संघटनेने आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरात मुंबई ,नवी मुंबई रक्तपेढीचे विशेष सहकार्य लाभले .यावेळी संजीव कुमार मोहन (मुख्य महाव्यवस्थापक उत्पादन) आधारभूत सेवा यांनी शिबिराचे उद्घाटन केले. याप्रसंगी मनिष मेहता महाव्यवस्थापक, वित्त आणि लेखा विभाग ,श्रीमती भावना आठवले (महाव्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन) यांची प्रमुख उपस्थित होती. तसेच ओएनजीसी उरण प्लांट चे अनिल देसाई वरिष्ठ उपाध्यक्ष, पराग कदम कार्याध्यक्ष संदीप बावडे सरचिटणीस, प्रदीप मयेकर उपाध्यक्ष ,उज्जेश तुपे सचिव, बाळकृष्ण काशीद ,सचिव दिलीप आरदाळकर, संघटक सचिव नितीन गवळी यांचे विशेष सहकार्य लाभले.


या शिबिरासाठी सहकार्य केले ते अपोलो, हिंदुजा, एमजीएम, नायर ,टाटा मेमोरियल आदु हॉस्पिटलचे योगदान महत्त्वाचे आहे. रक्तदान हे एक उदात्त कार्य आहे जे समाजातील गरजू लोकांना मदत करणे आणि रक्ताची गरज पूर्ण करते.

# जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूलमध्ये पालक वर्ग यांनी घेतला क्रीडा स्पर्धेचा आनंद

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी (हेमाली म्हात्रे ) :** आयुष्य हे खूप छोटं आहे.आयुष्यात प्रत्येक क्षणाचा आनंद हा सर्वांनी घ्यायला हवा. कारण जगात एक अंतिम सत्य आहे, खरा आनंद हा दुसऱ्याना देण्यात असतो. जर आनंद दिला तर तो लाखो पटीने वाढत असतो. सध्या सर्वत्र क्रीडा स्पर्धेचा हंगाम आहे.

क्रीडा स्पर्धा आणि विद्यार्थी हे समीकरण आपण नेहमीच पाहत असतो.परंतु प्रत्यक्षात वार्षिक क्रीडा महोत्सवासाठी विद्यार्थ्यांच्या पालक वर्ग यांनी दिलेला प्रतिसाद हा आगळा वेगळा असेल तर विरळच... जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मिडीयम शाळेत या वर्षीच्या क्रीडामहोत्सवात विद्यार्थ्यांचे पालक शालेय क्रीडा महोत्सवात विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन एक विद्यार्थ्यांसमोर तसेच सामाजिक स्तरावर






आदर्श ठेवला. आणि याद्वारे एक प्रकारचा सर्व विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला.आपण क्रीडा स्पर्धेमध्ये नेहमीच विद्यार्थी सहभागी होताना पाहत असतो परंतु जानकीबाई जनार्दन ठाकूर विद्यालयाच्या वार्षिक क्रीडा उत्सवामध्ये मोठ्या आनंदाने सहभाग घेतला. यामध्ये खेळाच्या विविध प्रकारचे खेळ म्हणजे संगीत खुर्ची बादलीत चेंडू तसेच रनिंग रेस व इतर मनोरंजन खेळ अशा विविध खेळांचा आनंद पालकांनी लुटला वार्षिक क्रीडा महोत्सव दरवर्षीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शारीरिक कसरतींना वाव देण्यासाठी विद्यालयात घेतला जातो अशा प्रकारचा उपक्रमात पालक सहभागी झाल्याबद्दल सर्व पालकांचे अभिनंदन... आत्माराम ठाकूर मिशन संस्थेचे व जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल चे सचिव वामन ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष प्रतीक ठाकूर, अलका ठाकूर , सिंधू ठाकूर, प्रसाद ठाकूर रिना ठाकूर तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे,शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व पालक वर्गाचे मनस्वी आभार मानले.

# उंडणगाव येथे एचआयव्ही, गुप्तरोगासह आरएमसी तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:** मराठवाडा ग्रामीण विकास संस्था (MGSVS) लिंक वर्कर प्रकल्प आणि आयसीटीसी ग्रामीण (वाले) सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उंडणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एचआयव्ही (HIV), एसटीआय (गुप्तरोग) तपासणी आणि आरएमसी (RMC) तपासणी शिबिर नुकतेच उत्साहात पार पडले. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरोग्य तपासणी करून घेतली. समाजात आरोग्याबाबत जनजागृती व्हावी आणि दुर्लक्षित रोगांवर वेळीच निदान व्हावे या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात एकूण ५६ नागरिकांची एचआयव्ही तपासणी करण्यात आली.यावेळी समुपदेशक सुनील वानखेडे यांनी उपस्थित लोकांना एचआयव्ही/एड्स याविषयी सविस्तर



मार्गदर्शन केले आणि प्रतिबंधात्मक उपायांची माहिती दिली. प्रयोगशाळा तंत्रज्ञ महेंद्र पाटील आणि सोनाली चौधरी यांनी उपस्थितांची एचआयव्ही तपासणी केली, तर प्राथमिक आरोग्य केंद्र, उंडणगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम पाटील माने यांनी नागरिकांची आरएमसी (RMC) तपासणी केली.लिंक वर्कर अरुण चव्हाण देशमुख यांनी एचआयव्ही होण्याच्या मुख्य चार कारणांविषयी माहिती दिली, तसेच इतर आरोग्यविषयक महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन केले.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. दिनाजी खंदारे, बी.एस. कुंटे, आर.एम. डोईफोडे (आरोग्य सहाय्यक), आर.व्ही. क्षीरसागर (एमपीडब्ल्यू), एम.डी. धनई, अविनाश उर्फ प्रवीण दसरे, जगदीश शिरसाठ, श्रीमती के.जी. सनानसे (सिस्टर), प्रणिता जयस्वाल (सिस्टर), आशा वर्कर कल्पना संपाळ, जबुन्निसा शगीर, मुमताज शहा, सुमन खराटे, येडूबाई वैद्य, इंदुबाई वैद्य, जयश्री मुळे, जबुन्ननीसा पठाण, विमलबाई निकम यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्र, उंडणगाव येथील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.



# उदगीर बिदर रोड रिल्यास पंपा समोर थांबलेल्या कंटनेरला जागीच आग, चालख जखमी

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी(बालाजी तेलंगे) :** उदगीर शहरापासुन जवळ असलेल्या बिदर रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ थांबलेल्या एका मालवाहू कंटेनरला बुधवारी रात्री ७ वाजेच्या सुमारास आग लागली. अग्निशामक दलाने आग विझविल्याने कंटेनरमधील मालाचे नुकसान टळले.

अहमदाबाद येथून रेफ्रिजरेटर घेऊन हैदराबादकडे कंटेनर जात होते. बुधवारी रात्री सात वाजेच्या सुमारास बिदर रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ कंटेनर - जी जे 18 बी डब्ल्यू 6868 - थांबला होता. कंटेनर चालक केबिनमध्ये स्वयंपाक करण्यासाठी गॅस स्टोह चालू केला होती. तेव्हा अचानक कंटेनरच्या केबिनमध्ये मोठी आग लागली, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

या आगीत कंटेनर चालक किरकोळ जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेची

माहिती नागरिकांनी उदगीरच्या अग्निशमक दलास दिली.काही वेळातच अग्निशामक दलाची गाडी आली. कर्मचाऱ्यांनी कंटेनरची आग विझविली. कंटेनरच्या समोरच्या भागात मोठी आग लागली होती. परंतु, पाठीमागे कंटेनरमध्ये असलेले रेफ्रिजेटर्सचे नुकसान टळले. आग विझविल्यानंतर कंटेनरमधील माल बाहेर काढण्यात आला.

# मुख्याधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय, शहरातील गुंठेवारी नियमित करू नये; आ. सुरेश आण्णा धस यांची अधिवेशनात मागणी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** राज्यातील अनियमित गुंठेवारी नियमित करण्यासंदर्भातील विधेयकावर मंगळवारी झालेल्या महत्त्वपूर्ण चर्चेत आष्टी/पाटोदा/शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी ठाम, आक्रमक आणि जनहिताची भूमिका सभागृहासमोर मांडली. राज्यातील अनेक नागरिकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावणारे हे विधेयक योग्य दिशेने जाणारे असले, तरी काही गैरकारभाराला संरक्षण मिळू नये, असा ठाम इशारा आमदार धस यांनी दिला. आमदार सुरेश आण्णा धस म्हणाले की, काही ठिकाणी महसूल अधिकाऱ्यांकडून परवानग्यांच्या प्रक्रियेत झालेल्या त्रुटींचा फायदा घेत काही दलालांनी शहरांच्या हद्दीत प्रचंड




गैरव्यवहार केले. नगर पंचायत, नगर पालिका किंवा नगर परिषद क्षेत्रातील खेळाची मैदाने, शाळांसाठी राखीव जागा, सार्वजनिक सुविधांसाठी राखीव भूखंड तसेच विकास आराखड्यातील (डी.पी.) विविध राखीव जागांवरही फाटे पाडून जागा विकल्या गेल्या. या नंतर या फाट्यांचे नियमितीकरण करण्यासाठी प्रस्ताव उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात आले आहेत, ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले. शहरांचा नियोजित विकास, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, खेळाची मैदाने आणि सामुदायिक जागांचा हक्क हिरावून घेणाऱ्या पद्धतीला कायदेशीर संरक्षण देणे म्हणजे भविष्यातील पिढीशी अन्याय करण्यासारखे आहे, असे आमदार सुरेश धस यांनी जोरदार आवाजात सांगितले. या पार्श्वभूमीवर शहर क्षेत्रातील कोणतीही गुंठेवारी नियमित करण्यापूर्वी संबंधित नगर पंचायत, नगर पालिका किंवा नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची लेखी परवानगी घेणे शासनाने बंधनकारक करावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी त्यांनी केली. अशी सक्त अट घालूनच गैरव्यवहार थांबतील, आरक्षित जागा वाचतील आणि शहरांचा संतुलित, नियोजित विकास कायम राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. आमदार सुरेश धस म्हणाले की, हे विधेयक सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारे आहे; परंतु चुकीच्या पद्धतीने आरक्षित जागांवर बांधलेले फाटे नियमित करण्यास परवानगी देणे पूर्णपणे अन्यायकारक ठरेल. आरक्षित जागा या भावी पिढ्यांचा शाश्वत हक्क आहे. त्या जागांवर झालेले अतिक्रमण कोणत्याही स्थितीत मान्य करता कामा नये, असे ते म्हणाले.

# नांदेड येथील ४ जणांची सीटू राज्य कमिटीवर फेर निवड - कॉ.उज्वला पडलवार सचिवपदी

**दैनिक युवक आधार**

**माहूर (सय्यद ईसा) :** कामगारांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या केंद्र सरकारच्या चार श्रम संहितांना प्रखर विरोध करत कामगार वर्गाची अस्मिता टिकवण्याचे आवाहन सीटूच्या १७ व्या महाराष्ट्र राज्य अधिवेशनातून करण्यात आले. ५ ते ७ डिसेंबरदरम्यान चेंबूर येथील आदर्श विद्यालय येथे हे अधिवेशन मोठ्या उत्साहात पार पडले.






अधिवेशनात कॉ.डॉ.डी.एल.कराड यांची अध्यक्ष, कॉ.अ‍ॅड.एम.एच.शेख यांची महासचिव तसेच कॉ.के.आर.रघु यांची कोषाध्यक्ष पदावर फेर निवड करण्यात आली. उपरोक्त अधिवेशनात राज्यातील २२ जिल्ह्यांमधून तसेच सात राज्यस्तरीय संघटनांमधून एकूण ३५७ प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यात ३५ टक्के म्हणजे तब्बल १३५ महिला प्रतिनिधींचा सहभाग लक्षणीय ठरला.राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाची भक्कम उपस्थिती यावेळी दिसून आली. सीटूचे राष्ट्रीय महासचिव माजी खासदार कॉ.तपन सेन, राष्ट्रीय अध्यक्षा कॉ.के.हेमलता, राष्ट्रीय सचिव कॉ.आर. करुमालयन यांच्यासह माजी आमदार कॉ.नरसय्या आडम, आमदार कॉ.विनोद निकोले यांनी अधिवेशनाला मार्गदर्शन केले.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी हजारो कामगारांच्या उपस्थितीत भव्य जाहीर सभा पार पडली. श्रम संहितांवर सरकारचा हेतुपुरस्सर हल्ला असल्याचा आरोप करत कॉ.हेमलता यांनी या कायद्यांविरोधात राज्यभर लढा अधिक तीव्र करण्याची भूमिका जाहीर केली. महाराष्ट्रात वाढत चाललेल्या बेरोजगारीकडे लक्ष वेधत कॉ. तपन सेन यांनी 'तीन चाकी सरकार'वर निशाणा साधला.

प्रतिनिधी सत्रात 'चार श्रम संहिता रद्द करा', 'जनसुरक्षा विधेयक मागे घ्या', 'कामगारांना किमान वेतन लागू करा' यांसारखे महत्त्वाचे ठराव एकमुखाने पारित करण्यात आले.

पुढील तीन वर्षांसाठी ४१ सदस्यीय पदाधिकारी मंडळासह १४१ सदस्यीय राज्य कार्यकारिणीची निवड करण्यात आली.त्यामध्ये नांदेड येथून जिल्हाध्यक्ष कॉ.उज्वला पडलवार यांची सचिवपदी तर सरचिटणीस कॉ.गंगाधर गायकवाड, जिल्हाउपाध्यक्ष कॉ.अनिल कराळे आणि कॉ.करवंदा गायकवाड यांची राज्य कमिटी सदस्यपदी फेर निवड करण्यात आली.त्यांच्या निवडी बद्दल जिल्हा कमिटीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले असून पुढील वाटचालीस सदिच्छा देण्यात आल्या.

# सिलेंडरचा स्फोट, बंद घराला लागली आग

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पंचशील नगर झोपडपट्टी नवीन पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेल्या बंद घरात सिलेंडरचा स्फोट झाल्याने आग लागली. काही वेळातच ही आग पसरली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र अनेक दुकानांचे नुकसान झाले.



11 डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास पंचशील नगर झोपडपट्टी रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेल्या बंद घराला आग लागली. सिलेंडरचा स्फोट होऊन ही आग लागली असल्याचे बोलले जात आहे. या आगीत हाय व्होल्टेजची एक चालू लाईन तुटून घरावर पडली. तर महावितरणची लाईन तुटून पडल्याने घराला आग लागली असल्याचे काही जण सांगत आहेत. त्यानंतर मोठ्या प्रमाणात आग भडकली. यावेळी नवीन पनवेल अग्निशामक दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी ही लाईन बंद केली या आगीमध्ये घराच्या मागच्या बाजूला असलेल्या दुचाकी पार्किंग मधील जवळपास दहा ते बारा वाहनांचे नुकसान झाले. अग्निशामक दलाने काही तासानंतर या आगीवर नियंत्रण मिळवले. दोन जेसीबीच्या सहाय्याने विझवलेले साहित्य बाजूला करण्यात आले. मात्र या आगीमुळे मोठ्या प्रमाणात नवीन पनवेल परिसरात वाहतूक कोंडी झाली होती.

# मुंबईतील १३,८०० उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांचे क्लस्टरमध्ये अंतर्भाव करण्यासाठी शासनाने निर्णय घ्यावा

## भाजपा गटनेते आ. प्रवीण दरेकर यांची लक्षवेधीद्वारे शासनाला विनंती

**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** मुंबईतील मोडकळीस आलेल्या जुन्या ३८८ इमारतींचा पुनर्विकास आणि दक्षिण व दक्षिण मध्य मुंबईतील १३,८०० उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचा महत्वाचा मुद्दा भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी आज सभागृहात लक्षवेधीद्वारे मांडला. यावेळी त्यांनी मुंबईतील १३,८०० उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांचे क्लस्टरमध्ये अंतर्भाव करण्यासाठी शासनाने निर्णय घ्यावा, अशी विनंती राज्य सरकारला केली. राज्य सरकारच्या वतीने गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. लक्षवेधीवर बोलताना आ. दरेकर म्हणाले कि, मुंबईत वडाळा, शिवडी, भायखळा आणि इतर उपनगरात चाळीत राहणाऱ्या लोकांसाठी जवळ जवळ ६० ते ७० वर्षापूर्वी ५ मजली इमारती बांधल्या. या इमारतींची संख्या ३८ एवढी आहे. आता या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. या ३८८ इमारतींच्या पुनर्विकासासाठी डीसीपीआर २०३४ मधील ३३ (२४) नियम लागू आहे. यातून पुनर्विकास करायचे म्हटले तरी मूळ रहिवाशांना द्यायची घरं, म्हाडाला द्यायची घरं आणि सेलेबल कंपोनंट याचे गणित बसत नाही. म्हणून कुणीही बिल्डर पुनर्विकासासाठी पुढे येत नाही. यासंदर्भात संघर्ष समितीच्या विनिता राणे यांनी निवेदन दिल्यानंतर मी २४ नोव्हेंबर २०२५ रोजी बैठक बोलावली. म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल आणि त्यांचे अधिकारी स्वत: उपस्थित होते. त्या बैठकीत त्यांना आम्ही पर्याय दिला. ३८८ इमारतींचा स्वत: म्हाडाने समूह पुनर्विकासाअंतर्गत पुनर्विकास करावा. कोणत्या इमारतींचा क्लस्टर होऊ शकतो, याचीही माहितीही त्यांना दिली. जयस्वाल यांनीही चांगला प्रतिसाद देत अगोदर इमारतीमधील रहिवाशांनी एकत्रित बसून समूह पुनर्विकासाचा ठराव करावा, आम्ही बिल्डर नेमण्यासाठी परवानगी देतो आणि हे शक्य झालं नाही तर म्हाडाने पुनर्विकास करावा, अशी मागणी करा त्यालाही परवानगी देऊ असे म्हटले. आमचं म्हणणं होते की, चार-पाच इमारतीमधील एवढी लोकं एकत्र येणं शक्य नाही. त्यामुळे पहिली प्रक्रिया न करता म्हाडाने थेट नोटीफिकेशन काढावं आणि स्वत: पुनर्विकास करावा. ३८८ इमारतींचा पुनर्विकास म्हाडा तशा पद्धतीने करणार का, असा सवालही दरेकरांनी केला.

दरेकर पुढे म्हणाले कि, दक्षिण आणि दक्षिण मध्य मुंबईतील १३,८०० जुन्या, मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारती आहेत. त्यांच्या पुनर्विकासाचा प्रश्न आहे. या म्हाडाच्या पुनर्रचित इमारती आहेत आणि त्या ७० ते ९० च्या दरम्यान बांधलेल्या आहेत. तर काही १०० वर्षापूर्वीच्या आहेत. येथील अनेक इमारती रस्ता रुंदीकरण, रेल्वे बफर झोन, रोड कटिंग, अरुंद गल्ली किंवा रस्ता यामुळे बाधित आहेत. काही स्टँड अलोन इमारती आहेत. काही ठिकाणी इमारतींचे मालक ॲबस्कॉंडींग आहेत, काही भारतातच नाहीत. काही इमारत मालकांच्या बाबतीत न्यायालयीन वाद आहेत, त्यामुळे त्या कोर्ट रिसिव्हर किंवा कोर्ट लिक्विडेटरच्या ताब्यात आहेत. मालक देखभाल व दुरुस्ती करत नाही म्हणून म्हाडाकडून गेली अनेक वर्षे देखभाल केली जात आहे. या इमारतींचा मालमत्ता कर, सेस किंवा इतर कुठलेही शासकीय शुल्क मालकाने वर्षानुवर्षे भरलेले नाही. ३५ ते ४० वर्षांपूर्वी सरकारने चॅप्टर ८ (अ) मधील १०३ (ब) नियमानुसार १०० पट भाडे भरुन चाळीचे मालक व्हा, असा कायदा भाडेकरुंसाठी केला. चाळ मालकांनी त्याविरुध्द उच्च न्यायालयात धाव घेतली, चाळ मालकांच्या विरुध्द निर्णय लागला. पण पुढे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं, तिथे पेंडींग आहे. महायुती शासनाने या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी २०२२ ला म्हाडा कायद्यात ७९ (अ) हे कलम समाविष्ट केलं. हा कायदाही सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या सर्व प्रकारामुळे मुंबईतील चाळीत राहणारा २० ते ३० लाख मध्यमवर्गीय पुनर्विकासापासून वंचित आहे. १३,८०० इमारतींचा पुनर्विकास होणार नाही. कारण या इमारती रस्ता रुंदीकरण, रेल्वे बफर झोन, रोड कटिंग, अरुंद गल्ली किंवा रस्ता यामुळे बाधित आहेत. काही स्टँड अलोन इमारती आहेत. १३,८०० इमारतींचा पुनर्विकास होणार नाही. या इमारतींच्या पुनर्विकासाची क्षमता होत नसेल तर बाजूला क्लस्टर पुनर्विकास होतोय त्यात त्यांचा अंतर्भाव करावा. स्वयं/समूह पुनर्विकासात ४-५ चाळी-इमारती एकत्रित आल्या तर त्यांची सोसायटी स्वतःहून पुनर्विकासात पुढे येईल. त्यामुळे शासनाने १३,८०० इमारतीत राहणाऱ्या लाखो लोकांसाठी बाजूच्या क्लस्टरमध्ये अंतर्भाव करावा त्याशिवाय त्यांचे स्वयं पुनर्विकास किंवा समूह पुनर्विकास करण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा, अशी विनंतीही दरेकर यांनी केली.

दरेकर यांच्या लक्षवेधीवरील विनंतीवर बोलताना गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील प्रत्येक सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला घर मिळाले पाहिजे यासाठी पंतप्रधान आवास योजना सुरु केली. त्याचपद्धतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात सर्वांसाठी घरे ही योजना सुरु केली. त्या माध्यमातून काही वर्षात मोठ्या प्रमाणावर राहणाऱ्या लोकांना घरे देण्याचे काम सुरु आहे. मुंबईत नागरिक सोसायटी, छोट्या घरांत राहतात. म्हाडाने ६०-७० वर्षांपूर्वी ज्या कॉलनी तयार केल्या त्या पुनर्रचित करण्यात आल्या मात्र त्यांचा पुनर्विकास होऊ शकला नाही. म्हाडा कायद्यात ७९ (अ) कलमाचा समावेश करण्यात आला होता. परंतु हा कायदा सुप्रिम कोर्टात प्रलंबित असल्याने अडचणी येत आहेत. या सर्व लोकांना घरे मिळण्याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक घेऊ. तातडीने पुनर्विकास करू, बाजूच्या क्लस्टरमध्ये असलेल्या घरांमध्ये लोकांना घरे देण्याची प्रक्रिया करू, असे आश्वासित केले.

**खालील इमारतींचे होऊ शकते क्लस्टर**

१) रामदूत इमारत क्र १ ते ६, करीरोड (शिवडी वॉर्ड क्र, २०३), जागेचे क्षेत्रफळ ६५०० चौमी

२) त्रिवेणी सदन इमारत क्र १ व २, करी रोड (शिवडी वॉर्ड क्र. २०३), जागेचे क्षेत्रफळ ५५०० चौ.मी

३) माउलीसदन, परळ, (शिवडी वॉर्ड क्र. २०३), जागेचे क्षेत्रफळ ४८०० चौमी

४) माधव भुवन क्र. १ व २, पटेल बिल्डिंग, परळ, (शिवडी वॉर्ड क्र. २०३), जागेचे क्षेत्रफळ सुमारे ४५०० चौमी

५) श्रमिक, संकल्प, अमेय, आधार बिल्डिंग क्र १ व २, विक्रांत सदन, मोरया, चिंतामणी, लालबाग, (शिवडी वॉर्ड क्र.२०३), जागेचे क्षेत्रफळ सुमारे ७५०० चौमी

६) सूर्यदर्शन अ, ब, क, ड, सिद्धांत अ, ब, क, साईकृपा अ,ब परळ व्हिलेज (शिवडी वॉर्ड क्र. २०२), जागेचे क्षेत्रफळ ५२५० चौमी

७) भक्ती, अभंग, अनंत निवास, भुवनेश्वर परळ व्हीलेज, (शिवडी वॉर्ड क्र.२०२), जागेचे क्षेत्रफळ अंदाजे ५००० चौमी

८) शिवशक्ती, सोनावाला, श्री. हरीहिंद माता दादर, (वडाळा विधानसभा जागेचे), क्षेत्रफळ अंदाजे ५००० चौमी

९) अमरदीप, मयुरेश, मंगलमूर्ती, मानस, रायगड निवास काळाचौकी लालबाग (शिवडी विधान सभा वॉर्ड क्र.२०५), जागेचे क्षेत्रफळ अंदाजे ६००० चौमी. अशाच प्रकारे लोअर परळ, प्रभादेवी, दादर, माहीम, वडाळा, मानखुर्द, सायन, गिरगाव, भायखळा, उमरखाडी, मदनपुरा, माझगाव, डोंगरी, ग्रॅन्ट रोड येथेही म्हाडा इमारतींचे क्लस्टर प्रकल्प आहेत.

# बिबट्याच्या मुक्त संचारमुळे हिमायतनगर शहरासह तालुक्यातील बोरगडी येथे भीतीचे वातावरण

## वन विभागाने रात्रीच्या ग्रस्त वाढविण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**माधव काईतवाड बोरगडीकर**

**हिमायतनगर :-** तालुक्यासह जिल्हाभरात दररोज कुठे ना कुठे बिबट्या आढळत असल्याची बातमी ऐकायला येत आहे तशीच बातमी दिनांक 11 डिसेंबरच्या रात्री हिमायतनगर शहरातील बोरगडी रोड येथे पोलीस स्टेशनच्या पाठीमागील भागात एक बिबट्या मुक्त संचार करत असल्याचा एक धक्कादायक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे या व्हिडिओमुळे हिमायतनगर शहरात सकाळी फिरायला निघालेल्या ज्येष्ठ नागरिकासह रात्रपाळी मध्ये पाणी देण्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की गेल्या काही दिवसांपासून शहरा सह तालुक्यात बिबट्या तसेच अन्य हिस्त्र वन्य प्राण्याचे दर्शन हिमायतनगर शहरासह वस्त्यांमध्ये होत असल्याची धक्कादायक



माहिती उघडकीस आली आहे आठ दिवसांपूर्वी हिमायतनगर शहरातील श्री परमेश्वर मंदिर देवस्थान येथे सकाळी सकाळी चार ते पाच वाजेच्या दरम्यान लांडगा हिस्त्र वन्यप्राणी चक्क परमेश्वर मंदिराच्या मुख्य कमानी समोर येऊन गेल्याची माहिती मंदिर कमिटी कडून मिळाली आहे त्यानंतर तालुक्यातील बोरगडी गावाजवळ दोन दिवसापासुन धानोरा, वारंगटाकळी सह आदी भागांमध्ये बिबट्याचा मुक्त संचार होत असल्याची माहिती आढळून आल्याची चर्चा आणि दहशत तालुक्यात पसरल्याने संबंधित शेतकरी हे रात्रपाळीचे शेताला पाणी देण्यासाठी जात नाही त्यामुळे शेती कामे ठप्प झाली आहे मात्र रात्रीच्या ग्रस्तीबद्दल वनविभाग अजूनही कुठलीही शर्तीचे प्रयत्न करताना दिसून येत नाही तर काही ठिकाणी दिवसा शेतावर जाणे सुद्धा शेतकऱ्यांना धोकादायक ठरत आहेत त्यात भर म्हणून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ढिसाळ नियोजनामुळे दिवसा लोड सेटिंग व रात्री वीजपुरवठा सुरू असल्याने शेती पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना मध्यरात्री शेतावर जावे लागत आहे आणि बिबट्याच्या आणि वन्य हिंस्त्र प्राण्याच्या हालचाली सध्या वाढलेल्या काळात हा प्रवास जीवावर बेतण्यासारखा आहे म्हणून जीवावर उदार होऊन काही शेतकऱ्यांना रात्रपाळीचे पाणी देण्यासाठी करावी लागणारी कसरत मोठी जोखीमेची आहे त्यामुळे या सर्व गंभीर घटनेवर हिमायतनगर तालुका वनविभागाने तातडीने पावले उचलून शहरासह ग्रामीण भागात मुक्तपणे संचार करणाऱ्या बिबट्या व वन्य प्राण्याचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी शहरातील सुजाण नागरिकासह शेतकरी वर्गातून होत आहे

# हाय टेन्शन तार तुटून पनवेल पंचशील नगर झोपडपट्टीत आग भडकली अनेक झोपड्या जळून खाक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** नवीन पनवेल पूर्वेकडील पंचशील नगर झोपडपट्टी परिसरात हाय टेन्शन इलेक्ट्रिसिटीची वायर तुटल्याने अचानक भीषण आग लागली. आज दुपारच्या सुमारास झालेल्या या घटनेमुळे परिसरात काही मिनिटांतच गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. आग वेगाने पसरत असल्याने अनेक झोपड्या जळून खाक झाल्या असून नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे

आगीची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस, वाहतूक शाखा, महावितरण अधिकारी आणि अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाने तत्काळ पाण्याचे फवारे मारत आग नियंत्रणात आणण्यास सुरुवात केली. गॅस



सिलेंडर आणि इतर ज्वलनशील पदार्थांच्या उपस्थितीमुळे आग अधिक धोकादायक बनण्याची शक्यता होती. अग्निशामक कर्मचारी सतर्क राहून आगीवर नियंत्रण मिळविण्यास यशस्वी ठरले. गंभीर बाब म्हणजे विचुंबे गाढी नदी पूल, पोदी स्मशानभूमी, विसपुते कॉलेज, सेक्टर १५, पंचशील नगर, श्रीयश हॉस्पिटल ते नवीन पनवेल ब्रिजपर्यंत तब्बल तीन किलोमीटर हाय टेन्शन वायर लोंबकळत असल्याचे समोर आले. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक चालत असल्याने नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.घटना पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्वेकडील पार्किंग आणि रिक्षा स्टँड परिसरात घडली. यात पार्किंगमध्ये ठेवण्यात आलेल्या दुचाकींचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे . बिकानेर स्वीट्स समोरील हाय टेन्शन टॉवरवरून वायर तुटली आणि झोपड्यांवर कोसळताच आग लागली असल्याचे प्रत्यक्षदर्शीने सांगितले आहे धुराचे प्रचंड झोत वरपर्यंत उठल्याने स्टेशन परिसरातील प्रवासी आणि स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली. ही दुर्घटना शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या महत्त्वाच्या वेळेत घडल्याने शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेबद्दल पालकांमध्ये भीती निर्माण झाली.रिक्षा वाहतूक व स्कूल बस काही काळ विस्कळीत झाल्या तर स्टेशन परिसरातही प्रवाशांची गर्दी वाढली आणि वाहतुकीत अडथळे निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे माजी सभापती ॲड. मनोज भुजबळ, पनवेल नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष संदीप पाटील आणि टीआयपीएलचे जगदीश घरत घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नागरिकांची विचारपूस करत प्रशासनाला मदतकार्य गतीमान करण्याचे निर्देश दिले.

# महिलांविरोधातील अत्याचारा विरोधात 'ऑरेंज द वर्ल्ड' कॅम्पेन पनवेलमध्ये संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** महिलांच्या विरोधात होत असलेल्या हिंसाचाराच्या विरोधात इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी, विर वुमेन्स फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी या तिन सामाजिक संस्थानी एकत्र येऊन पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मदतीने "ऑरेंज द वर्ल्ड "या जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते .

महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत जनजागृती निर्माण करण्याच्या विषया बाबतीत नितीन ठाकरे यांनी दाखवलेली उत्फुर्तता व मदत निश्चितच वाखाणण्यासारखी होती . त्याचप्रमाणे पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील वं त्यांच्या सहकाऱ्यांचेही सहकार्य क्लबला ही रॅली उत्तमरीत्या पार पाडण्यास कामी आले . इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी ही महिलां मार्फत चालवली जाणारी सामाजिक संस्था आहे इथे



वेगवेगळ्या स्तरातील महिला एकत्र येऊन विविध प्रकारचे समाजकार्य तसेच जनजागृती पर उपक्रम राबविले जातात . या वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर या क्लबने ऑरेंज द वर्ल्ड या थीम अंतर्गत सर्व क्लबना महिलांच्या विरोधात होत असलेल्या अन्यायाविरोधात आपापल्या क्लबमध्ये वेगवेगळ्या माध्यमांतून जनजागृती करण्याचे आवाहन केले होते . या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग म्हणून तसेच महिलां विषयी बांधीलकी जपण्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीने या रॅलीचे आयोजन केले होते . वडाळे तलाव येथुन त्याचा श्रीगणेशा करण्यात आला.रॅलीमध्ये पनवेल पोलीस आपापल्या बाईकवरून रॅलीच्या अग्रस्थानी व अन्य सर्व सदस्य शिस्तीत त्यांच्या मागोमाग यापद्धतीने रॅली प्रामुख्याने पनवेल येथील वडाळे तलाव येथुन सुरु होऊन क्रमशः जेष्ठ नागरिक हॉल , म्युनिसिपल कॉरपोरेशन, जय भारत नाका, शिवाजीपुतळा, आंबेडकर पुतळा व नंतर ब्रीजखालून पनवेलबस स्टॅडच्या रोडने पुन्हा वडाळे तलावावर येऊन रॅलीची सांगता करण्यात आली . नंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांजुर्णे यांनी महिलांना संकटाच्या वेळी बचावासाठी स्वतःला कशा प्रकारे तयार करावे व स्वत :च्या सुरक्षेची काळजी कशी घ्यावी यावर उत्तम मार्गदर्शन केले . तसेच पनवेल वाहतूक पोलीस यावेळी सर्व महिलांनी अतिशय शिस्तबद्धतेचे प्रदर्शन करत कुठल्याही प्रकारची नारेबाजी न करता केवळ गाडीवर लावलेल्या बॅनरच्या माध्यमातून आपला संदेश लोकांपर्यंत पोचवण्याच्या उत्कृष्ट प्रयत्न केला . यावेळी उपस्थित सर्व महिलांनी थीम फॉलो करण्यासाठी घातलेल्या ऑरेंज ड्रेस कोडने जनतेचे लक्ष वेधून घेतले .यावेळी अर्चना ठाकुर तसेच क्लबच्या प्रेसिडेंट सिंपल आंचलिया, सेक्रेटरी युक्ती शाह, पीपी ध्वनी तन्ना , आयपीपी . प्रतिभा डांगी, खजिनदार . ममता ठक्कर ,एडीटर . मौसमी गोगुला , जॉईट सेक्रेटरी . वैशाली कटारिया, सीसी. प्रिया चतुर्वेदी मेंबर . नम्रता बांठीया ,शिला शाह, डॉ . भावना मुरुडकर , किर्ती मुनोत, दुर्गा चौधरी , तसेच वीर वुमेन्स ग्रुपच्या सदस्या पुनम जैन, श्रुती निस्सर, सीमा जैन व रोटरी क्लबचे हर्मेश तन्ना , रोहित जाधव , दिप्ती जाधव उपस्थित होते

# ना . भरतशेठ गोगावले यांच्यावर खोटा व्हिडीओ बनवून बदनामी करणाऱ्या शेकाप नेत्या चित्रलेखा पाटील यांचा जाहीर निषेध





**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन: प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि गोर-गरीबांचे खरे कैवारी ना. भरतशेठ गोगावले यांचा खोटा व्हिडीओ बनवून योजनाबद्ध पद्धतीने बदनामी करण्याचा डाव आखणाऱ्या शेकापच्या चित्रलेखा पाटील यांच्या निषेधार्थ आज छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवसेनेतर्फे जाहीर निदर्शने करण्यात आली.या प्रसंगी तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुका प्रमुख सुरेश मिरगळ, उपतालुका प्रमुख ओमकार शेलार, माजी जिल्हापरिषद सदस्य अविनाश कोळंबेकर, शहर प्रमुख सावन तवसाळकर, प्रजोत नांदवीडकर महिला आघाडी शहर अध्यक्षा सुप्रिया करदेकर, युवासेना शहर प्रमुख अजय चव्हाण, सलोनी मोहित आदी पदाधिकारी उपस्थित होते.निषेध आंदोलनादरम्यान चित्रलेखा पाटील यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस जोडे मारून संतप्त शिवसैनिकांनी तीव्र निषेध व्यक्त केला.यावेळी बोलताना माजी जि.प. सदस्य अविनाश कोळंबेकर म्हणाले,"ना. भरतशेठ गोगावले यांच्यावर अशाप्रकारे खोटे आरोप करण्याचा कोणाचा प्रयत्न झाला, तर आम्ही श्रीवर्धन बंदची हाक देऊ.

> राजकारणातील ढोंग उघडे पडले!
>
> ज्या शेतकरी कामगार पक्षाने आणि त्यांच्या नेत्यांनी कधीकाळी खा. सुनील तटकरे यांच्यावर बैलगाडीभर भ्रष्टाचाराचे पुरावे काढणारे नाटक केले होतेत्याच पक्षातील चित्रलेखा ताई आज तटकरे साहेबांचे गुणगान करत फिरत आहेत!त्यांच्या सुपारीखोर राजकारणाचा भाग म्हणून त्यांनी ना. भरतशेठ गोगावले यांच्यावर केलेले बिनबुडाचे आरोप हा राजकीय दिवाळखोरीचा पराकाष्ठा आहे.याचा शिवसेना श्रीवर्धन संघटना तीव्र शब्दांत निषेध करते
>
> सावन तवसाळकर
> शिवसेना शहर प्रमुख, श्रीवर्धन

## तरुण पिढीला मार्गदर्शनाची गरज – प्रकाश सोनवणे

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/नागपूर :** सध्याच्या काळात तरुण पिढी ही व्यसनामध्ये अधिक अडकत चालली आहे. पैसे कमावण्याचे सोपे उपाय शोधत आहे . महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात उच्च पदाधिकारी आहेत .मोठे उद्योजक आहेत. त्यांनी आताच्या पिढीला मार्गदर्शन करण्याची गरज आहे. व्यसनापासून दूर ठेवण्याची नितांत गरज आहे.परंतु ग्रामपंचायत पासून ते लोकसभेपर्यंत चुनाव दरम्यान मतदारांना दारूचे लालच दाखवून मतदारांना व्यसनाधीन करतात. त्यामुळे तो व्यक्ती सुद्धा व्यसनाधीनाच्या आहारी जाऊ शकतो. व्यसनाधीनतामुळे अनेक कुटुंब उध्वस्त होतात. उघड्यावर पडतात. त्यामुळे ती व्यक्ती आपल्या मुलांना योग्य शिक्षण देऊ शकत नाही. व दारूवर मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करतात. त्याचप्रमाणे



जोपर्यंत कुठलाही व्यक्ती आपल्या स्वतःच्या पायावर उभा होत नाही तोपर्यंत त्यांनी आपल्याला राजकारणापासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आजची तरुण मंडळी कितीही शिकली सवरली तरी त्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करावीच लागते. त्या त्याशिवाय त्यांचे भविष्याचे करिअर घडत नसते. यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे. पुणे ,संभाजीनगर , मुंबई येथे 12 वी नंतर काम करत असलेल्या मुलांना काम करत असताना व्यावसायिक शिक्षण कसे घ्यायचे याकरिता शासन स्तरावर गावागावात मार्गदर्शन केंद्र उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे मत ब्ल्यू स्टार टीव्ही न्यूज चॅनेल चे मुख्य संपादक प्रकाश बळीराम सोनवणे यांनी पत्रकार संजीव भांबोरे यांच्याशी बोलताना सांगितले .

## पोफाळी कारखान्यात मिलच्या रॅकमध्ये पडून उमरखेड येथील युवा हेल्परचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड :** वसंत सहकारी साखर कारखाना द्वारा भैरवनाथ शुगर वर्क्स येथे एक दुर्दैवी घटना घडली आहे, कारखान्याच्या मिल विभागात काम करत असताना कामगार हेल्परचा रॅक मध्ये पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे, हि घटना गुरुवारी सकाळी सव्वा दहा वाजताच्या दरम्यान घडली असून,शेख इरफान शेख उमदू( वय 34) रा.महात्मा फुले वार्ड, उमरखेड असे मृत्यू झालेल्या कामगार हेल्परचे नाव आहे.



शेख इरफान शेख उमदु हे मिल विभागात कामगार हेल्पर म्हणून कामावर होते.आज सकाळी कामावर आल्यानंतर सकाळी मिलवर बग्यासच्या साफसफाईचे काम करत असताना अचानक पाय घसरून मिलच्या रॅक कॅरिअरमध्ये पडले, रॅक कॅरियर मध्ये पडल्याचे दुसऱ्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात येताच त्या कर्मचाऱ्याने रॅक बंद करून त्यांना बाहेर काढत तात्काळ त्यांना उपचारासाठी उमरखेड येथे नेत असताना वाटतच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# चंद्रपुरातील नवरगावच्या मथुरा ताई प्रकरणी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची संवेदनशील दखल

## प्रशासनाला तत्काळ व दीर्घकालीन उपाययोजनांचे निर्देश

### ज्या स्त्रीच्या वेदनेवरून कायदे बदलले, तिला समाजाने न्याय दिलाच पाहिजे” — डॉ. नीलम गोऱ्हे

**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगाव येथे १९७२ मध्ये देशाला हादरवून सोडणाऱ्या अत्याचार प्रकरणातील पीडिता मथुरा ताईंना आजही आयुष्याच्या उत्तरार्धात हालाखीच्या परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याची माहिती मिळताच विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संवेदनशील दखल घेत स्वतः नवरगावला जाऊन त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. हलाखीच्या आणि अर्धांगवायूग्रस्त अवस्थेत राहत असलेल्या मथुरा ताईंसाठी डॉ. गोऱ्हे यांनी आवश्यक तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजनांचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले. यावेळी संतोष थिटे अतिरिक्त जिल्हाधिकारी, किशोर घाडगे एसडीओ, विजया झाडे तहसीलदार, आत्मज मोरे गट विकास अधिकारी व स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त जेहलम जोशी उपस्थित होत्या.

डॉ. गोऱ्हे यांनी चंद्रपूर



जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून मथुरा ताईंना वैद्यकीय उपचार, पेन्शन, अन्नधान्य, घरकुल, आर्थिक ठेव तसेच सर्व संबंधित कल्याणकारी योजनांचा तात्काळ लाभ मिळवून देण्याचे निर्देश दिले होते. प्रशासनाने तत्परता दाखवत आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या असून आजच्या भेटीत डॉ. गोऱ्हे यांनी त्याचा सविस्तर आढावा घेतला. पुढील सहाय्य, पुनर्वसन आराखडा आणि देखरेख यंत्रणा याबाबत अधिकाऱ्यांसोबत त्यांनी सखोल चर्चा केली.

याप्रसंगी डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, “मथुरा ताईंच्या प्रकरणाचा उल्लेख माननीय सरन्यायाधीश भूषण गवई यांनीही केला होता. त्या काळी पीडित महिलेला न्याय नाकारला गेला आणि त्यानंतर ‘कस्टोडियल जस्टिस टू विमेन’ कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी आम्ही विद्यार्थी व स्त्री मुक्ती आंदोलनात दीर्घ संघर्ष केला. जवळजवळ वीस वर्षांच्या लढ्यानंतर हा महत्त्वाचा कायदा देशाला मिळाला. त्या स्त्रीच्या वेदनेतून कायदा बदलला, पण आज त्या स्वतःच गंभीर विपन्नावस्थेत आहेत—ही बाब निश्चितच वेदनादायी आहे.”

मथुरा ताईंच्या कुटुंबाची परिस्थिती जाणून घेतल्यानंतर डॉ. गोऱ्हे यांनी त्यांच्या मुलांना स्थिर रोजगार, घरकुल आणि आवश्यक शासकीय लाभ तातडीने देण्याचे निर्देश दिले. “कुटुंबासमोर वारंवार कागदपत्रांची मागणी करून अडथळे निर्माण करू नयेत. ग्रामसेवकाला नोडल अधिकारी नेमून प्रत्येक शासकीय भेटीची नोंद व फोटो जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवणे बंधनकारक करावे,” असे त्यांनी ठामपणे सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, “अनेक लोक कागदपत्रे घेऊन जातात; पण त्याचा उद्देश मथुरा ताईंना कळत नाही. आता येणाऱ्याने ओळखपत्र दाखवणे बंधनकारक असावे. विधिमंडळ हे माणसांसाठी आहे; म्हणूनच अधिवेशन सुरू असतानाही मी इथे आले. ज्या स्त्रीच्या वेदनेवरून कायदे बदलले, त्या स्त्रीला समाजाने न्याय दिलाच पाहिजे. मथुरा ताईंच्या नावाने मदतीचा गैरवापर होऊ नये, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.”

माध्यमांनी दाखवलेल्या संवेदनशीलतेचे कौतुक करत त्या पुढे म्हणाल्या, “न्याय नेहमी न्यायालयातूनच मिळतो असे नाही; काहीवेळा कायदे बदलूनही न्याय द्यावा लागतो. महिलांच्या चळवळीच्या इतिहासातील हे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे आहे.”

डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सक्रीय पुढाकारामुळे मथुरा ताईंच्या स्वास्थ्य, सुरक्षेसाठी सातत्याने देखरेख ठेवली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## नागाव हादरले !बिबट्या शोध मोहीम रिकामी ; वनविभाग हाय अलर्ट वर

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा/अलिबाग प्रतिनिधी :** अलिबागमध्ये वन्यजीव बचाव पथक स्थापन करण्याची तयारी,नागाव परिसरात मंगळवारी घडलेल्या बिबट्या हल्ल्यानंतर वनविभागाने बुधवारी मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबविली. तब्बल ८० वनकर्मचारी, अधिकारी, तसेच स्थानिक पंचायतीच्या सहकार्याने नागावच्या विविध वाड्यांत सकाळपासून शोध घेण्यात आला; मात्र दिवसभराच्या प्रयत्नांनंतरही बिबट्या किंवा त्याच्या हालचालींचा कोणताही ठसा आढळून आला नाही. त्यामुळे तो स्वतःहून नैसर्गिक अधिवासाकडे परतला असण्याची शक्यता वन अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

व्यापक शोधमोहीम – तरीही ठसे नाही,मंगळवारी सहा नागरिक जखमी



झाल्यानंतर वनविभागाने बुधवारी सकाळी मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबविली. नागावमधील विविध वाड्यांत, झाडीत, ओढ्याजवळ, रिकाम्या शेतांमध्ये तपासणी करण्यात आली. तरीही कोणताही ठसा, पाऊलखूण किंवा हालचालींचा पुरावा सापडला नाही."बिबट्या मानवी वस्त्यांच्या आवाजाने आणि हालचालींनी दूर निघून गेलेला असण्याची शक्यता आहे," असे उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी सांगितले.नागरिकांमध्ये भीती; वनविभागाचे जनजागृती अभियान. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांना सतर्क करण्यासाठी वनविभागाने गावोगावी जाऊन जनजागृती मोहीम सुरू केली आहे."वनअधिकाऱ्यांनी नागरिकांना खालील सूचना दिल्या :रात्री दरवाजे–खिडक्या बंद ठेवाव्यात.लहान मुलांना एकटे सोडू नये.पाळीव जनावरे सुरक्षित स्थळी बांधून ठेवावीत.बिबट्या दिसला तर त्याच्या मागे धावू नये, दगड–काठ्या घेऊन गर्दी करू नये.आरडा-ओरड, फ्लॅशलाइट, मोठे आवाज केल्यास बिबट्या भडकू शकतो.वनअधिकाऱ्यांनी स्पष्ट केले, “बिबट्या सहसा स्वतःहून हल्ला करत नाही. मंगळवारी झालेला हल्ला हा अनावधानाने लोकांची गर्दी आणि गोंधळ निर्माण झाल्यामुळे झाला.” शाळा बंद; पुढील निर्णय प्रशासन घेणार, शोधमोहीमेच्या पार्श्वभूमीवर बुधवारी नागाव परिसरातील शाळा बंद ठेवण्यात आल्या."उद्या शाळा सुरू करण्याबाबतचा निर्णय जिल्हा प्रशासनाशी चर्चा करून घेणार आहोत," असे सरपंच हर्षदा मयेकर यांनी सांगितले. अलिबागमध्ये वन्यजीव बचाव पथकाची स्थापना.नागाव घटनेनंतर अलिबाग वनपरिक्षेत्रात वन्यजीव बचाव पथक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**या पथकात पुढील सुविधा उपलब्ध करण्यात येणार :** जखमी प्राण्यांसाठी बचाव आणि उपचार केंद्र,विशेष वन्यजीव बचाव व्हॅन,अत्याधुनिक पिंजरे, "केंद्र सरकारच्या मंजुरीनुसार डार्ट गन खरेदी"वनकर्मचाऱ्यांना बिबट्या पकडण्यासाठी विशेष प्रशिक्षण. उपवनसंरक्षक राहुल पाटील म्हणाले,“नागाव आणि आसपासच्या भागात पुढील काही दिवस शोधमोहीम सुरू राहील.

## सफाई कामगारांच्या घराचे आंदोलन तीव्र होणार; अशोक जाधव यांचा सरकारला इशारा

**दैनिक युवक आधार**

**नागपूर / रमेश औताडे :** शहराची स्वच्छता करत असताना आपल्या मालकी हक्काचे घर कधी होणार. अशी स्वप्न अनेक वर्ष पाहत असणारा सफाई कामगार आता नागपूर अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलन करून हक्काचे घर मागत आहे. सरकारने आमच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार केला नाही तर आंदोलन निवडणुकीच्या तोंडावर तीव्र होईल असा इशारा म्युनिसिपल मजदुर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव यांनी दिला आहे.

मुंबईतील २१ हजार ८६८ सफाई कामगारांपैकी केवळ पाच हजार ८०० कामगारांना सरकारने मालकी हक्काची घरे दिली असून उर्वरित हजारो कामगारांचे प्रश्न प्रलंबितच आहेत. या अन्यायाविरोधात म्युनिसिपल मजूर युनियनने नागपूर



विधानसभेसमोर लक्षवेधी उपोषण सुरू केले. अनेक वर्षांपासून शासन व महापालिकेकडे मालकी हक्काच्या घराची मागणी केली. मात्र अद्यापही १६ हजार हून अधिक कामगारांना घर मिळालेले नाही. विधानसभेच्या समित्यांमध्येही कामगारांच्या घरकुल निर्णयाला संमती देण्याची चर्चा झाली होती. परंतु अंतिम निर्णय लांबत चालल्याने कामगारांच्या सहनशक्तीचा अंत होत असल्याचे युनियनचे सरचिटणीस वामन झरेकर, कार्याध्यक्ष रामचंद्र बिराजदार यांनी सांगितले.

## नोवेल साळवे यांच्या हल्लेखोराना त्वरित अटक करा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** काही महिन्यांपूर्वी पूर्वी उल्हासनगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ला बद्दल महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तीन वेळा निवेदन देऊन त्यांच्यावर हल्ला करणारे दोषींवर कुठलीच कारवाई झाली नाही व गुन्हेगारांना पाठीशी घालणारे पोलीस अधिकारींवर ही कुठलीच कारवाई करण्यात आली नसल्याकारणाने नोवेल साळवे यांचा चार दिवसांपासून आझाद मैदान मुंबई येथे धरणा आंदोलन सुरू आहे परंतु आश्चर्याची गोष्ट आहे महाराष्ट्र विधानसभा चे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरू असताना देखील आजपर्यंत कुठल्याही



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदारांनी किंवा मोठ्या नेत्यांनी साळवे यांच्या आंदोलना विषय प्रश्न उपस्थित केले नाही, राज्य सरकार कडून न्याय मिळेपर्यंत माझा आंदोलन सुरू राहील.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष महाराष्ट्रातील येवढा मोठा पक्ष असुन देखील आम्हाला गेल्या चार दिवसांपासून आझाद मैदान मुंबई येथे धरणा आंदोलन करत आहेत तरी राज्य सरकार दखल का घेत नाही असा आरोप नोवेल साळवे करत आहेत.

## देवगाव विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी शांताराम ढवळे; व्हाईस चेअरमनपदी ज्योत्सना आढागळे बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** देवगाव विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर रोटेशन पद्धतीनुसार चेअरमन व व्हाईस चेअरमन पदांच्या निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी दौंडे आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रावसाहेब पगारे यांच्या उपस्थितीत संचालक मंडळाची बैठक पार पडली. बैठकीत शांताराम ढवळे यांची चेअरमनपदी तर ज्योत्सना आढागळे यांची



व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. चेअरमन पदासाठी शांताराम ढवळे यांनी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या अर्जावर धनंजय जोशी यांनी सूचक तर रामनाथ बोचरे यांनी अनुमोदक म्हणून सही केली.व्हाईस चेअरमन पदासाठी ज्योत्सना आढागळे यांनी अर्ज दाखल केला असून सूचक म्हणून सतिष बोचरे तर अनुमोदक म्हणून मंगला बोचरे यांनी सही केली. दिलेल्या मुदतीत याच दोन्ही अर्जांची नोंद झाल्याने निवडणूक बिनविरोध ठरली.निवड जाहीर करताना पॅनलचे नेते माजी प.स. सदस्य भाऊसाहेब बोचरे, माजी सरपंच विनोद जोशी, संचालक धनंजय जोशी, सतिष बोचरे, रामनाथ बोचरे, सतिष लोहारकर, संतोष जाधव, दिगंबर सोमवंशी, शांताराम ढवळे, दिपक लोहारकर, दत्तू बोचरे, सौ. मंगला बोचरे, सौ. चंद्रकला खुळे तसेच राजेंद्र कांबळे, बन्सीभाऊ आढागळे, शामराव लोहारकर, संजय उफाडे, योगेश निलख, भास्कर आढागळे, सुनिल माने आदी उपस्थित होते.

> "संस्थेच्या विकासाबरोबर सभासदांच्या हिताला प्राधान्य"
> संस्थेचे कामकाज करताना सर्व संचालकांना विश्वासात घेऊन संस्थेची प्रगती साधत राहीन. सभासदांच्या हिताला सर्वाधिक महत्त्व दिले जाईल
>
> — शांताराम ढवळे, नवनिर्वाचित चेअरमन

## सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संघ भंडारा धडकला मोर्चा विधिमंडळावर

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे नागपूर -** सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संघ भंडाराच्या वतीने विविध मागण्यांसाठी विधिमंडळावर मोर्चा काढण्यात आला होता. मात्र, पोलिसांनी तो मॉरिस कॉलेज टी-पॉइंट येथे अडविला. मोर्चात सहभागी विविध सुशिक्षित बेरोजगार सेवा संस्थांच्या प्रतिनिधींनी आपल्या मागण्यांसाठी नारेबाजी करून शासनाचे लक्ष वेधून घेतले. मोर्चातील शिष्टमंडळाने मंत्रि महोदयांना निवेदन दिल्यानंतर हा मोर्चा मागे घेण्यात आला.

मोर्चाचे नेतृत्व संजय मते, राकेश मलेवार, श्रीकांत लांजेवार, भूपेंद्र मिश्रा,राहुल शामकुमार, विजय दुबे, मनिषा भांडारकर, माजी शिक्षणाधिकारी के झेड शेंडे, आनंद बिसने, संजय वाघमारे, रामटेके साहेब, लोकेश तिरपुडे, संजय समरित, संजय तलमले, अरविंद सेलोकर, यांनी केले

देण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये विनानिविदा काम वाटपाची मर्यादा 10 लाख करण्यात आली असून, ही काम वाटप समितीमार्फतच वाटप करावी.

सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना बांधकामाची कामे व बहाल



करून सार्वजनिक बांधकाम विभागात नोंदणी करण्यात आले आहे. परंतु कामाची टक्केवारी ठरविल्याने २५ टक्केवारी निश्चित करून न्याय द्यावा.सर्व शासकीय कार्यालयांत विविध प्रकारची कामे सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थांना देण्यात यावी.

## जमीन विक्रीच्या बहाण्याने मजूर ठेकेदाराला घातला लाखोंचा गंडा; त्रिकुटाविरोधात पोलिसांत गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेलमधील त्रिकुटाने चेरवली येथील ६० गुंठे जमीन विक्री करण्याच्या बहाण्याने कोपरखैरणेती रमेश वेटा (६९) या मजूर ठेकेदाराला ९२ लाख ७३ हजारांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भीमराव राठोड, वासुदेव लाड व बाळाराम लाड अशी त्रिकुटाची नावे असून, पनवेल शहर पोलिसांनी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

रमेश वेटा यांची नोव्हेंबर २०११ मध्ये भीमराव राठोड याच्याशी ओळख झाली होती. दरम्यान, राठोड याने त्याच्या मालकीची चेरवली येथे ६० गुंठे जमीन असल्याचे सांगून ती प्रती गुंठा १ लाख रुपयांप्रमाणे ६० लाख रुपयांमध्ये विकत घेण्यास सांगितले होते. त्या वेळी राठोड याने खोटे व बनावट सातबारा उतारे दाखवून जमीन त्याच्या नावावर असल्याचे भासवले होते. त्यामुळे रमेश वेटा यांनी जमीन खरेदीसाठी राठोड याला पैसे देण्यास सुरुवात केली. मार्च २०१२ मध्ये पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात या जमीन खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणीही करण्यात आली. एवढेच नव्हेतर राठोड याने २०१२ चे बनावट सातबारा दाखले ही रमेश वेटा यांना सादर केले. त्यामुळे त्यांनी राठोड याला ५३ लाख ८० हजार रुपयांची रक्कम धनादेशद्वारे दिली. मात्र, मे २०१२ मध्ये ही जमीन राठोड यांच्या नावावर नसून त्याचे मूळ मालक वासुदेव आणि बाळाराम विठ्ठल लाड हे दोघे असल्याचे वेटा यांना समजले. त्यानंतर लाड यांनीदेखील त्यांच्या नावे असलेल्या जमीन व्यवहारात अडथळा निर्माण करणार नसल्याचे सांगून वेटा यांच्याकडे २० लाखांची मागणी केली. त्यावर वेटा यांनी दबावाखाली रोख व चेकद्वारे लाड यांना २० लाख रुपये दिले. त्यानंतर या तिघांनी संगनमत करून रमेश वेटा यांच्या नावावर जमीन न करता जून २०१४ मध्ये राठोड यांच्या नावावर करून घेतली. त्यानंतर जमीन किंवा पैसे देण्यास टाळाटाळ करू लागल्याने अखेर वेटा यांनी या तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# ऑल इंडिया सिफेरर्स युनियनच्या पाठपुराव्यामुळे विमानतळावर नाविकांना मिळणार न्याय

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** विमानतळावरील नाविकांना होणाऱ्या अडचणी, बनावट/संपादित डॉक्युमेंट्सची समस्या आणि एजंट्सद्वारे होणाऱ्या फसवणुकीबाबत ऑल इंडिया सिफेरर्स युनियन तर्फे पाठपुरावा करण्यात आल्या मुळे त्यांना लवकरच न्याय मिळणार आहे .



या संदर्भात ऑल इंडिया सिफेरर्स युनियनचे, भाजप।कामगार मोर्चा महाराष्ट्र सरचिटणीस संजय पवार , ऑल इंडिया सिफेरर्स युनियन चे कार्याध्यक्ष अभिजित सांगळे , ऑल इंडिया सिफेरर्स युनियन चे सरचिटणीस अमरसिंह ठाकूर यांनी मुंबई येथे डी जी शिपिंगचे कॅप्टन पी. सी. मीना, डेप्युटी डायरेक्टर जनरल (क्रू), यांची शिष्टमंडळासह भेट घेऊन त्यांच्याशी विमानतळावरील नाविकांना येणाऱ्या अनेक अडचणींसंदर्भात चर्चा केली यात डी जी शिपिंगचे कॅप्टन पी. सी. मीना यांनी अडचणी समजून घेऊन अनेक महत्वाचे बदल करण्याचे आश्वास न दिले . त्यामध्ये फॉर्म पासपोर्टशी लिंक करणे ज्यामुळे फॉर्म मध्ये कोणत्याही प्रकारे एडिटिंग/छेडछाड होणार नाही. देशभर जनजागृती मोहीम सीफेअर्स युनियन आणि डी जी शिपिंग संयुक्तरीत्या संपूर्ण भारतात जागरूकता कार्यक्रम राबवणार , एजंट ट्रेस-बॅक प्रोटोकॉलची अंमलबजावणी बनावट डॉक्युमेंट पुरवणाऱ्या खऱ्या आरोपींचा शोध घेऊन कारवाई करणार,डिटेन नाविकांना कायदेशीर मदत व समुपदेशन अडचणीत सापडलेल्या नाविकांना लगेच सहकार्य व मार्गदर्शन करणार , नाविकांवर एफआयआर टाळणे , विमानतळ पोलीस स्टेशनमध्ये नाविकांवर एफआयआर न करता थेट एजंट आर पी एस एल वर कडक कारवाई करण्याचा निर्णय या बैठकीत झाला .ही बैठक भारतीय नाविकांच्या सन्मान, सुरक्षितता आणि करिअरच्या संरक्षणासाठी एक मोठे पाऊल आहे.

> **ऑल इंडिया सीफेअर्स युनियन नाविकांच्या हक्कांसाठी नेहमीच लढत राहील आणि प्रणालीमध्ये पारदर्शकता व न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे.**
> **- ऑल इंडिया सिफेरर्स युनियनचे, भाजप।कामगार मोर्चा महाराष्ट्र सरचिटणीस संजय पवार**

# आवाज महामुंबईचा चॅनेलचा पहिला वर्धापन दिन मोठ्या दिमाखात साजरा!; अनेक मान्यवरांची उपस्थिती!!

## आवाज महामुंबईचा चॅनेल सर्वात वेगवान; कामगार नेते महेंद्र घरत यांचे प्रतिपादन!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** आवाज महामुंबईचा चॅनेल चा पहिला वर्धापन दिन चिरनेर येथील मानसी फार्म येथे मोठ्या दिमाखात आणि उत्साहात संपन्न झाला.

यावेळी अनेक मान्यवर आणि आवाज महामुंबईचा चॅनेल चे राज्यभरातील पत्रकार आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.संपादक मिलिंद खारपाटील आणि मी खूप जुने मित्र आहोत. ते पत्रकार,लेखक ,कवी, गुणवंत कामगार असे अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे आहेत. त्यांचे आवाज महामुंबईचा चॅनेल हे चालत नाही तर वेगाने पळत आहे.वाऱ्याच्या वेगाने चॅनेलवर अचूक बातम्या येत असून हे चॅनेल सर्वात वेगवान असल्याचे त्यांनी सांगितले. एका वर्षातील प्रगती पाहिली तर भविष्यात हे चॅनेल महाराष्ट्र राज्यातील अग्रगण्य चॅनेल होईल असे कार्यक्रमाचे अध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत यांनी म्हटले.

योग्य ,अचूक आणि वेगवान बातमीबद्दल डॉ मेधा किरीट सोमैया यांनी



संपादक मिलिंद खारपाटील यांचे कौतुक केले.शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांची स्वराज्याची प्रेरणा घेऊन सर्व पत्रकारांना सोबत घेऊन हे चॅनेल सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली.या कार्यक्रमात उद्घाटक राजाशेठ खारपाटील, शेलार मामा यांचे वंशज उद्योजक गणपत शेलार, शिवसेना नवी मुंबई उपजिल्हाप्रमुख मनोज इसवे,नानक साई फाऊंडेशन चे प्रमुख पंढरीनाथ बोकारे, सिने अभिनेत्री अर्चना गोमे, सिने अभिनेत्री प्रज्ञा म्हात्रे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अरविंद पाटील, जनशिक्षण संस्थान रायगड चे संचालक विजय कोकणे,रयत शिक्षण संस्था रायगड चे माजी अधिकारी रोहिदास ठाकूर,चाईल्ड केअर संस्थेचे अध्यक्ष विकास कडू,चिरनेर चे माजी सरपंच पद्माकर फोफेरकर,सामाजिक कार्यकर्ते विद्याधर ठाकूर, आगरी समाज परिषदेच्या उरण तालुकाध्यक्षां सीमा घरत, पत्रकार धम्मशील सावंत आदी मान्यवरांनी त्यांच्या भाषणातून चॅनेलसाठी शुभेच्छा दिल्या.नानक साई फाऊंडेशन.. घुमान यात्रा यांच्याकडून संपादक मिलिंद खारपाटील यांना संत नामदेव जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आगरी समाज परिषदेच्या उरण तालुका अध्यक्षा सीमा घरत यांनी संपादक मिलिंद खारपाटील यांची आगरी समाज परिषदेच्या उरण तालुका चिटणीस पदी निवड जाहीर केली.या कार्यक्रमात उद्योगपती राजाशेठ खारपाटील यांचा ६२ वा वाढदिवस साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात धीरेंद्र ठाकूर ,रत्नप्रभा बेल्हेकर, प्रतीक्षा चव्हाण, डॉ विकासकुमार, डॉ देविदास बामणे, कृष्णा कदम, शिवराम उतेकर,उत्तमकुमार कडवे यांना उल्लेखनीय कार्याबद्दल आवाज महामुंबईचा सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित केले.राजेश सोंडकर, प्रकाश कदम, धनराज गोपाळ, कृष्णा भोसले, सचिन घबाडी,अनंत नारंगीकर, संदेश पाटील,विनायक पाटील ,मंगल खारपाटील यांना आवाज महामुंबईचा पत्रकारिता सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले.उत्तमकुमार कडवे आणि सिमरन मोकल यांच्या सुमधुर गाण्यांनी कार्यक्रमात एक विशिष्ट उंची गाठली होती.कार्यक्रमात धीरेन ठाकूर यांचे अंगावर रोमांच उभे करणारे शिवव्याख्यान झाले.यावेळी उपस्थित पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांकडून छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवराय अशा घोषणा देण्यात आल्या. सुंदर अशा मानसी फार्म वर उपस्थित पत्रकारांनी छान अशी फोटोग्राफी केली.आवाज महामुंबईचा चॅनेल च्या वर्धापन दिनासाठी चॅनलचे पत्रकार सचिन घबाडी यांनी मानसी फार्म दिला .

प्रास्ताविक संजय होळकर सर यांनी केले.संपादकीय मनोगत श्री मिलिंद खारपाटील यांनी व्यक्त केले.आभार सुदर्शन जाधव यांनी मानले.

# "ग्रामीण आवाजाचा राज्यस्तरीय गौरव!" - शहाजी दिघे व शंकर सोनवणे यांना महाराष्ट्र गौरव रत्न २०२५

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** महाराष्ट्रातील सामाजिक -जागरूकता, ग्रामीण प्रश्नांवरील भेदक लिखाण आणि धारदार पत्रकारितेची ओळख निर्माण करणारे सामाजिक पत्रकार शहाजी सुखदेव दिघे आणि शंकर किसन सोनवणे यांना यंदाचा "महाराष्ट्र गौरव रत्न २०२५" हा राज्यस्तरीय प्रतिष्ठेचा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या गावकऱ्यांच्या वतीने व अनेक संघटनेच्या वतीने त्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यात आले जिल्हाभरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.





७ डिसेंबर रोजी श्रीरामपूर शहरात प्रथमच या भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न असून, ग्रामीण पत्रकारितेतील त्यांच्या प्रभावी कार्याचा अधिकृत गौरव मंचावर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला

ग्रामीण भागातील दुर्लक्षित प्रश्नांना राज्याच्या पातळीवर नेणे, शासनाला उत्तरदायी धरणे, सामाजिक बदलासाठी निर्भीड भूमिका मांडणे— या त्यांच्या कार्यामुळे दोघेही ग्रामीण पत्रकारितेतील प्रभावी चेहरे ठरले आहेत. पत्रकारितेबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांतही त्यांनी सक्रिय भूमिका निभावली आहे. त्यांची स्पष्ट लेखनशैली, जनतेच्या प्रश्नांवरील ठाम भूमिका आणि प्रशासनासमोर प्रश्न रेटण्याची धडाडी ही त्यांची ओळख बनली आहे.

या सोहळ्याला बॉलिवूड, मराठी आणि साऊथ चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकारांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे आयोजन आर. एन. जी. सी. ग्रुप व विद्यराज फाऊंडेशन यांच्या वतीने होते

नियोजन डॉ. सुरेश झाडे, सिनेअभिनेते सुनील पाटील व डॉ. निहाल राजू कांबळे यांनी केले आहे.

हा सन्मान म्हणजे केवळ दोन पत्रकारांचा गौरव नसून— ग्रामीण पत्रकारितेच्या सामर्थ्याची दखल आणि लोकशाही बळकट करणाऱ्या लेखणीचा सन्मान असल्याचे सर्वत्र व्यक्त होत आहे.

# अकाऊंट ब्लॉक झाल्याचे सांगत तरुणाच्या खात्यातून २२.८९ लाख केले लंपास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** नवी मुंबई बँक तसेच गुगल पे अकाऊंट ब्लॉक झाल्याचे सांगत एका सायबर चोरट्याने ऑनलाइन पद्धतीने तळोजा येथे राहणाऱ्या २२ वर्षीय तरुणाकडून तब्बल २२ लाख ८९ हजार रुपये ऑनलाइन उकळल्याची घटना समोर आली आहे. पवन असे या तरुणाचे नाव असून त्याच्या वडिलांनी त्याच्या नावावर बँकेत ठेवलेली फिक्स डिपॉझिटची संपूर्ण रक्कम या सायबर चोरट्याने लाटली. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

तक्रारदार तरुण तळोजा येथे राहतो. गेल्या ऑगस्टमध्ये रविकुमार यादव असे नाव सांगणाऱ्या एका सायबर चोरट्याने या तरुणाशी संपर्क साधून त्याचे बँक अकाऊंट व गुगल पे ब्लॉक झाल्याचे सांगत हे अकाऊंट पुन्हा सुरू करायचे असेल तर ओटीपी पाठवावा लागेल, असे सांगितले. त्यामुळे घाबरलेल्या पवनने त्याच्या मोबाईलवर आलेले सर्व ओटीपी रविकुमार याला पाठवले. या ओटीपींचा गैरवापर करून सायबर चोरट्याने ३९ ऑगस्ट रोजी १८ लाख रुपये आणि १ सप्टेंबर रोजी आणखी ४ लाख ८९ हजार रुपये असे एकूण २२ लाख ८९ हजार रुपयांचा ऑनलाइन व्यवहार करून रक्कम लंपास केली. ही माहिती पवनला समजल्यावर त्याने ती घरच्यांना सांगितली व त्यानंतर त्याने तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सायबर चोरटा रविकुमार यादव याच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. दरम्यान, सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी त्यांचा ओटीपी कोणालाही देऊ नका, अन्यथा तुमचीही अशा प्रकारे फसवणूक होईल, अशी सूचना पोलिसांनी केली आहे.

# दिव्यांग सप्ताहानिमित्त स्वेटर वाटप

## मा.मुख्याध्यापक एकनाथ महाजन यांचा संवेदनशील उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** शहरातील "अंध–अपंगांच्या सेवेला वाहूया आणि सर्वांगीण विकासासाठी हातभार लावूया" या भावनेतून जिल्हा परिषद केंद्रीय शाळा, सोयगाव येथे दिव्यांग सप्ताहानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले.वाढत्या थंडीच्या दिवसांत संरक्षण मिळावे हा सद्भावनेचा उद्देश या उपक्रमामागे होता.या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या माजी मुख्याध्यापक तथा माजी नगरसेवक आणि समाजसेवक मा.एकनाथ महाजन सर यांच्या पुढाकाराने करण्यात आले.स्वेटर




वितरण मा.एकनाथ महाजन,माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष रविंद्रभाऊ काळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बंटीभाऊ काळे,राजेंद्र दुतोंडे,अण्णाभाऊ वाघ,रविंद्र साखळे,तसेच पालक सुधाकर सोहनी यांच्या हस्ते पार पडले.

स्वेटर मिळाल्यावर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद मनाला स्पर्शून जाणारा होता.या प्रसंगी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, शिक्षिका सुरेखा चौधरी,पंकज रगडे, मंगला बोरसे,सविता पाटील,अकुश काळे, गणेश बाविस्कर,अनिल देसाई,तानाजी जाधव,शुभम देसले,पूनम लाड आदी शिक्षक उपस्थित होते.

> **मा.मुख्याध्यापक एकनाथ महाजन सरांची प्रतिक्रिया**
> **"दिव्यांग विद्यार्थी हे समाजातील अनमोल रत्ने आहेत.त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे,त्यांना आत्मविश्वास देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. थंडीपासून संरक्षण मिळावे म्हणून स्वेटर वाटप केले. पुढील काळातही अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी योगदान देत राहणार आहे."**

# डॉ. नंदकुमार मारुती जाधव यांना 'महात्मा ज्योतिबा फुले नॅशनल सन्मानपदक' जाहीर

## शैक्षणिक आणि सामाजिक सेवेबद्दल प्रतिष्ठित मान्यता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी संतोष आमले**

बाबू जगजीवन राम कला, संस्कृती तथा साहित्य अकादमीच्या वतीने दिला जाणारा देशातील प्रतिष्ठित 'महात्मा ज्योतिबा फुले नॅशनल सन्मानपदक' यंदा डॉ. नंदकुमार मारुती जाधव यांना प्रदान करण्यात येणार आहे. राजधानी दिल्ली येथे लवकरच होणाऱ्या राष्ट्रीय सोहळ्यात हा गौरव समारंभ पार पडणार आहे.डॉ. जाधव यांनी गेली अनेक वर्षे शैक्षणिक, सामाजिक आणि विशेषतः बौद्धिक अक्षम मुलांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा अनेक मुलांचे आयुष्य घडविण्यासाठी सातत्याने



काम करत आहे. शिक्षणासोबतच क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, स्वावलंबन प्रशिक्षण आणि समाजामध्ये जागृती निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे.

या उल्लेखनीय योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेऊन अकादमीने त्यांना हा मानाचा सन्मान जाहीर केला आहे. विशेष मुलांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असल्याचे अकादमीने नमूद केले आहे.हा तिसरा राष्ट्रीय पुरस्कार आहे

1) भारत माता राष्ट्रीय पुरस्कार

2)राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार - केंद्रीय सरकार मिळाला असून या सन्मानामुळे विशेष शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठी प्रेरणा मिळणार असून, डॉ. जाधव यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विविध क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अमित शहा यांनी आम्हांला हिंदुत्व शिकवू नये ? उद्धव ठाकरेंचा संतप्त सवाल

**दैनिक युवक आधार**

**नागपूर ( नासिकेत पानसरे ) :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मला हिंदुत्व शिकवू नये. आता त्यांच्या आणखी काही गोष्टी बाहेर पडत आहेत. जीनांच्या थडग्यावर कोणी माथा टेकवला इथपासून ते बऱ्याच आहेत. नवाज शरीफांचा केक कोणी खाल्ला होता इथपासून बऱ्याच गोष्टी आहेत. अगदी देशाबरोबर अतिरेकी कारवाया करणाऱ्या पाकिस्तानबरोबर यांचा मुलगा क्रिकेट खेळत आहे. तेव्हा यांचं हिंदुत्व कुठे जातं. कोणत्या टोपी खाली दडतं असा संतप्त सवाल शिवसेना ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. ते पुढे म्हणाले की जय शाह त्यांचं ऐकत नसेल तर मी हिंदुत्ववादी आहे, जय शाह हिंदुत्ववादी नाही असं अमित शाह यांनी सांगावं. तो पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळतोय. त्याला क्रिकेट बोर्डाचा राजीनामा तरी द्यायला लावा. नाही तर हिंदुत्व तरी स्वीकारायला लावा अशी मागणीच ठाकरे यांनी यावेळी केली.नागपूर येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

शामाप्रसाद मुखर्जी यांचे मुस्लीम लीग बरोबर कसे साटेलोटे होते. त्यांनी बंगालच्या चळवळीत 'चले जाव'ला कसा विरोध केला होता. फझरुल हक बरोबर बंगालच्या सरकारमध्ये यांचे देव शामाप्रसाद मुखर्जी देशप्रेम बाजूला ठेवून कसे सामील झाले होते. हे आता सगळे आलेले. तीन ठिकाणी यांचे मुस्लीम लीग सोबत सरकार होते असा आरोप उध्दव ठाकरे यांनी यावेळी केला. आणि हे यांचे राजकारणात जन्मदाते त्यांच्या लोकांनी आम्हाला हिंदुत्व शिकवायचे.त्यामुळे अमित शाह यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवण्याच्या फंद्यात बिलकुल पडू नये असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

**वंदे मातरमवरील चर्चा संघाचे कपडे फाडण्यासाठी?; उद्धव ठाकरे यांच्या विधानाने खळबळ**

भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. तसेच गोमांसांचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी केंद्र सरकारला चांगलंच धारेवर धरलं. तुमच्या मंत्रिमंडळात गोमांस खाणारे मंत्री आहेत. मी गोमांस खातो. कोण मला आडवतो बघतो असं ते म्हणतात, असं यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे, तसेच यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर देखील जोरदार हल्लाबोल केला आहे.

दिल्लीत संघाच्या कार्यालयासाठी प्राचीन मंदिर पाडलं. ही बातमी जोरात चालली. संघाच्या कार्यालयासाठी मंदिर पाडलं, तुम्ही हे कृत्य करतात. मी मुख्यमंत्री असतना साधूची घटना घडली. त्याला सरकार जबाबदार आहे असं चित्र तुम्ही तयार केलं. साधू हत्याकांडावरून आमच्या सरकारला बदनाम केलं. त्या हत्याकांडातील व्यक्तीला भाजपमध्ये घेताना तुमचं हिंदुत्व काय मेलं होतं का. लाज वाटली पाहिजे अमित शाह यांना आणि भाजपला त्यांनी माझ्या हिंदुत्वावर शंका घेतली, तुमच्या बुडाखाली काय आहे ते आधी पाहा, असा हल्लाबोल यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, न्यायामूर्तींवरची केस पाहा. माझी न्यायामूर्तींनीही आक्षेप घेतला आहे. मंदिराच्या आवारात दिवा लावण्यावरून वाद आहे. तिथे दिवा लावलाच पाहिजे. उत्सव साजरा झालाच पाहिजे. हिंदुत्वावरून अमित शाह यांनी शिकवू नये. वंदे मातरम ही चर्चा त्यांनी संघाचे कपडे उतरवण्यासाठी घेतली की काय अशी आता शंका येते. ते ज्यांना देव मानतात त्या शामाप्रसाद मुखर्जींचं सुद्धा मुस्लिम संघटनेंबरोबर काय साटंलोटं होतं, आणि त्यांनी चलेजाव चळवळीला कसा विरोध केला होता, फजरुल हक बरोबर बंगालच्या सरकारमध्ये यांचे देव, माझे नाहीत, शामाप्रसाद मुखर्जी देशप्रेम बाजूला ठेवून सामील झाले होते. हे सर्व आलं आहे. तीन ठिकाणी त्यांनी मुस्लिम लीग सोबत सरकार स्थापन केलं होतं. हे त्यांचे राजकारणातील जन्मदाते त्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवायचं? असा थेट सवालच यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला.